१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, रविवार १० मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३०, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 230 Marathi - Daily - Pune, 10 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in
Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री: सुवेंदू अधिकारी
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### ठाणे-मुलुंडदरम्यान उपनगरीय रेल्वे स्थानकाला केंद्राची मंजुरी

**मुंबई** - मुंबई आणि ठाणे दरम्यान वाढत चाललेली प्रवासी गर्दी लक्षात घेता ठाणे आणि मुलुंड स्थानकांदरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक उभारण्यास केंद्र सरकारने तत्त्वत: मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे मुंबईतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे या प्रकल्पास हिरवा कंदील दिल्याची माहिती दिली आहे. ठाणे-मुलुंड दरम्यान नवीन स्थानक उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. ठाणे आणि मुलुंड ही मध्य रेल्वेवरील अत्यंत वर्दळीची स्थानके असून, या दोन्ही स्थानकांमधील वाढती गर्दी लक्षात घेता नव्या स्थानकाची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या संदर्भात केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

### इंद्राणी मुखर्जीला परदेशी जाण्याची परवानगी नाही

**मुंबई** - शिना बोरा हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी व शिनाची आई इंद्राणी मुखर्जी हिची परदेशी जाण्याची विनंती न्यायालयाने फेटाळली. इंद्राणीला २ आठवड्यांसाठी स्पेन व ब्रिटनला जायचे होते. त्यासाठी तिने विशेष न्यायालयात परवानगीसाठी



अर्ज केला होता. तिच्या अर्जावर विशेष न्यायाधीश जे.पी. दरेकर यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी सरकार पक्षाच्या वतीने तिच्या मागणीला विरोध करताना तिला विमान प्रवास करू देणे धोक्याचे आहे, असा दावा करण्यात आला होता. तो ग्राह्य धरत न्या.दरेकर यांनी इंद्राणीला परवानगी नाकारली. हा खटला आता अंतिम टप्प्यात आला. अगदी थोड्या साक्षीदारांची उलट तपासणी होणे बाकी आहे. खटल्याचा लवकरच निकाल लागण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत परदेश प्रवासाची परवानगी देता येणार नाही, असे न्या. दरेकर यांनी स्पष्ट केले.

# विजय यांनी अखेर बहुमताचा ११८ आकडा जुळवला
# व्हीसीके, आययूएमएलचा पाठिंबा! औपचारिक पत्र दिले

**तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होऊन पाच दिवस उलटूनही न सुटलेला सत्तास्थापनेचा पेच आज अखेर सुटला. या निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या विजय यांच्या टीव्हीके पक्षाला बहुमताचा ११८ गाठता न आल्याने राज्यपालांनी दोन वेळा परत पाठवले होते. आज व्हीसीके आणि आययूएमएल या दोन छोट्या पक्षांनी टीव्हीकेला पाठिंब्याचे औपचारिक पत्र दिले. त्यामुळे टीव्हीकेचे बहुमताचे ११८ आमदारांचे गणित जुळून सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला.**



■ चेन्नई

२३४ **सदस्यांच्या** तामिळनाडू विधानसभेत टीव्हीकेने १०८ जागा जिंकल्या आहेत. त्यापैकी दोन जागा टीव्हीके प्रमुख विजय यांनी जिंकल्या आहेत. त्यांना एक जागा सोडावी लागणार आहे. परिणामी, टीव्हीकेकडे १०७ आमदार आहेत. काँग्रेसच्या पाच आणि भाकप व माकपच्या प्रत्येकी दोन आमदारांचा पाठिंबा दिला होता. त्यामुळे टीव्हीकेचे संख्याबळ ११६ वर पोहेचले होते. परंतु कागदावर बहुमत असल्याशिवाय शपथ देणार नाही, अशी भूमिका राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी घेतली. त्यामुळे विजय यांना राजभवनातून रिकाम्या हाताने परतावे लागले होते. बहुमत जुळत नसल्याने विजय यांच्या मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी दोन वेळा रद्द करावा लागला. काल टीव्हीकेने व्हीसीके आणि इंडियन युनियन मुस्लीम लीग (आययूएमएल) या पक्षांशी बोलणी सुरू केली होती. या दोन्ही पक्षांकडे प्रत्येकी दोन आमदार आहेत. यातील एका पक्षाने पाठिंबा दिला, तर विजय यांच्या नेतृत्वाखाली आघाडीचे सरकार स्थापन होऊ शकत होते. परंतु या पक्षांनी टीव्हीकेला तसे पत्र न दिल्याने सत्ता स्थापनेचा मुहुर्त लांबणीवर पडला. व्हीसीके उपमुख्यमंत्रिपदासाठी अडून बसल्याने पाठिंब्याचे पत्र दिले नाही, असे नंतर सांगितले गेले. काल टीव्हीके या आणखी एका पक्षाचा पाठिंबा असल्याचा दावा केला होता. या पक्षाचा एकमेव आमदार आहे. मात्र टीव्हीकेच्या दाव्यानंतर अर्ध्या तासात एएमएमकेचे सरचिटणीस टीटीव्ही दिनकरण यांनी राज्यपालांना फोन करून खळबळ उडवून दिली. त्यांच्या पक्षाच्या एकमेव आमदाराची स्वाक्षरी बनावट असल्याचा आरोप दिनकरण यांनी केला. काही वेळातच आमदार कामराज यांच्यासह दिनकरण यांनी राज्यपालांची भेट घेऊन 'टीव्हीके'वर घोडेबाजाराचा आरोप केला. कामराज यांनी ती स्वाक्षरी आपली नसल्याचे सांगितले. दुसरीकडे, टीव्हीकेने एक व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे, ज्यात कामराज विजय यांना पाठिंब्याचे पत्र लिहिताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला.

अखेर आज टीव्हीकेच्या व्हीसीकेशी वाटाघाटी यशस्वी होऊन त्यांनी पाठिंबा जाहीर केला. पाठोपाठ आययूएमएलचेही बिनशर्त समर्थन मिळाले. ही घडामोड करताच विजय यांच्या समर्थकांनी जल्लोश केला. राज्यपाल लवकरच विजय यांना शपथविधीसाठी बोलावतील.

दरम्यान, घोडेबाजाराच्या भीतीने काँग्रेसने आपले पाच आमदार हैदराबादला पाठवले आहेत. मेलूरचे आमदार पी. विश्वनाथन हे आमदारांच्या या गटाचे नेतृत्व करत आहेत. टीव्हीकेचे सरकार स्थापन झाल्यास पी. विश्वनाथन यांना मंत्री केले जाऊ शकते, असे सांगितले जात आहे.

## परग्रहांवर खरेच एलियन आहेत? अमेरिकेने प्रथमच अहवाल दिला

**नासाच्या अपोलो चांद्रमोहिमेच्या वेळी अंतराळवीरांना चंद्रावर अनेक रहस्यमय वस्तू आणि उडत्या तबकड्या दिसल्या होत्या, अशी चर्चा गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. आता अमेरिकेकडून अधिकृतरित्या या संदर्भातील माहिती जाहीर करण्यात आली आहे. उडत्या तबकड्यांसंदर्भातील सिक्रेट फाइलचा पहिला भाग अमेरिकेत काल जाहीर केला. ट्रम्प प्रशासनाने शेकडो नवे व्हिडिओ, फोटो आणि जुने सरकारी दस्तऐवज सार्वजनिक केले. या फाइल्समध्ये नासाच्या अपोलो मोहिमांशी संबंधित छायाचित्रे आणि अंतराळवीरांचे संभाषण आहे. त्यामुळे पुन्हा एकदा परग्रहवासी आणि उडत्या तबकड्यावर नव्याने चर्चा होऊ लागली आहे.**

■ वॉशिंग्टन

**ट्रम्प** प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या दस्तऐवजांमध्ये नासाच्या अपोलो १२ आणि अपोलो १७ मोहिमांशी संबंधित फोटो आणि संभाषणांचे रेकॉर्डिंग आहेत. एका छायाचित्रात चंद्राच्या पृष्ठभागावरील आकाशात तीन रहस्यमय बिंदू दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. अपोलो १७ मोहिमेच्या संभाषणाचा लेखाजोखा सर्वाधिक चर्चेत आला आहे. पेंटागॉनने जाहीर केलेल्या उडत्या तबकड्यांच्या फाइल्सनुसार, १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेतील अंतराळवीरांनी अवकाशात फटाक्यांसारखे चमकणारे रहस्यमय कण पाहिल्याचा दावा केला होता. चंद्र मोहिमेच्या संभाषणाच्या नोंदींमध्ये अंतराळयानाच्या बाहेर दिसलेल्या या अज्ञात घटनांचा उल्लेख करण्यात आला आहे. वैमानिक रोनाल्ड इव्हान्स यांनी संभाषणात म्हटले होते की, आम्ही




अंतराळयान वळवत असताना काही अतिशय चमकदार कण किंवा तुकडे आमच्या जवळून तरंगताना दिसत आहेत. त्यानंतर वैमानिक हॅरिसन श्मिट यांनी सांगितले, माझ्या खिडकीबाहेर अनेक मोठ्या चमकदार वस्तू दिसत आहेत जणू ४ जुलैची (अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन) फटाक्यांची आतषबाजी दिसत आहे. या मोहिमेदरम्यान घेतलेल्या एका छायाचित्रात चंद्राच्या पृष्ठभागावर त्रिकोणी आकारात तरंगणारे तीन बिंदू दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे छायाचित्र यापूर्वीही सार्वजनिक झाले होते, मात्र ते शुक्रवारी » पान २ वर

## विकास लवांडे यांना शाईने अंघोळ
## कीर्तनकार संग्राम भंडारेंविरुद्ध गुन्हा

■ पुणे

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना आज सकाळी अक्षरशः शाईने अंघोळ घालून धक्काबुक्की करण्यात आली. ह.भ.प. संग्राम भंडारे आणि त्यांच्या समर्थकांनी हा हल्ला केल्याचा आरोप लवांडे यांनी केला. या प्रकरणी त्यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीनुसार संग्राम भंडारे आणि अक्षय कांचन यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी वारकरी संप्रदायात प्रतिगामी आणि धर्मांध विचारांच्या लोकांची घुसखोरी होत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर विकास लवांडे



यांनी याप्रकरणी घुसखोरांची यादी जाहीर केली होती. त्यात किर्तनकार संग्राम भंडारे यांच्यासह अनेकांची नावे होती. याच कारणास्तव हा हल्ला करण्यात आला असावा, असा आरोप लवांडे यांनी केला आहे. या हल्ल्याशी संबंधित सर्व लोकांवर तातडीने कारवाई

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

करून ताब्यात घेण्याची मागणी करत लवांडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी » पान २ वर

## 'आयआरबी'ला टोल वसुलीतून घबाड
## एप्रिल महिन्याची कमाई ७९३ कोटी

■ नवी दिल्ली

**आयआरबी** इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेड या टोल वसुलीचे कंत्राट घेणाऱ्या कंपनीच्या महसुलात गेल्या एप्रिल महिन्यात २४ टक्क्यांची भरघोस वाढ झाली. कंपनीची एप्रिल महिन्यामधील कमाई तब्बल ७९३ कोटी रुपये आहे. आयआरबीने शेअर बाजाराला ही माहिती दिली आहे.

देशभरातील २४ टोल नाक्यांचे व्यवस्थापन विरेंद्र म्हैसकर प्रमुख असलेली आयआरबी कंपनी पाहते. आयआरबी एमपी एक्स्प्रेस-वे प्रायव्हेट लिमिटेड या आयआरबी समूहातील कंपनीकडे मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे, जुना मुंबई-पुणे महामार्ग एनएच-४ यांचे व्यवस्थापन आहे. या मार्गांकडून आयआरबीला सर्वाधिक १५७ कोटी रुपयांचा महसूल मिळाला. गेल्या वर्षी हा आकडा १५०.७ कोटी रुपये होता. त्यामध्ये साधारणपणे ७ कोटी रुपयांची वाढ यंदाच्या एप्रिलमध्ये झाली. यासंदर्भात माहिती देताना आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ मोरस्का म्हणाले की, नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात २४ टक्के वाढीने झाली हे उत्तम आहे.

## टीसीएस प्रकरण तीन स्तरीय रॅकेट
## मंत्री संजय शिरसाट यांचा आरोप

■ छत्रपती संभाजीनगर

**नाशिकमधील** टीसीएस कंपनीतील धर्मांतर आणि लैंगिक अत्याचार प्रकरणावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकरणात धर्मांतर, लव्ह जिहाद आणि ड्रग तस्करी असे तीन स्तरीय रॅकेट सक्रिय असल्याचा आरोप केला. हे प्रकरण केवळ निदा खानपुरते मर्यादित नाही, त्यामागे संघटित यंत्रणा कार्यरत असल्याचे म्हणत त्यांनी या प्रकरणाची एसआयटीकडून चौकशी करण्याची मागणी केली. याबरोबर एमआयएम प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील आणि मतीन पटेल यांचीही चौकशी करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहिले आहे.



संजय शिरसाट यांनी आरोप केला की, टीसीएसमधील प्रकरण निदा खानपुरते मर्यादित नाही. इम्तियाज जलील यांनी एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेलला निदा खानला घर देण्यास सांगितले. मतीन पटेलला वाचवण्यासाठी असदुद्दीन ओवैसी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये आले आहेत. एकाला वाचवण्यासाठी दुसरा धडपड करतो आहे. निदा खान प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी कठोर भूमिका घेतली आहे. एमआयएमचा नगरसेवक आरोपी आहे. » पान २ वर

## सुवेंदू अधिकारींचा शपथविधी
## मोदींचा बंगाली जनतेला दंडवत



■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून म्हणून सुवेंदू अधिकारी यांनी आज शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्याला नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आदि प्रमुख नेत्यांसह वीस राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांसह पाच मंत्र्यांनीही आज शपथ घेतली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंचावर गुडघे टेकवून हात जोडत बंगाली जनतेला केलेले वंदन चर्चेचा विषय ठरले.

भाजपाने पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी यांची निवड कालच केली होती. कोलकात्याच्या ब्रिगेड परेड ग्राउंडवर हजारो कार्यकर्ते आणि



समर्थकांच्या उपस्थितीत आज सकाळी ११ वाजता त्यांचा शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्यात पंतप्रधान मोदी यांनी सुरुवातीला रवींद्रनाथ टागोर यांच्या तसवीरीला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मंचावर उपस्थित भाजपाचे जुने जाणते निष्ठावंत कार्यकर्ते ९८ वर्षीय माखनलाल सरकार यांची गळाभेट घेत चरणस्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घेतले. मोदींच्या या कृतीने कार्यकर्ते आणि समर्थक भारावले.

सुवेंदू अधिकारी यांच्यासह पाचही मंत्र्यांनी बंगाली भाषेत शपथ घेतली. » पान २ वर

## पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांना 'ईडी'च्या धाडींनंतर चंदीगडमधून अटक

■ चंदीगड

**पंजाबचे** आपचे मंत्री संजीव अरोरा यांना यांच्यावर आज ईडीने छापेमारी केली. चंदीगडमधील त्यांच्या सरकारी निवासस्थानी, दिल्ली आणि गुरुग्राममधील ठिकाणांवर टाकण्यात आले. त्यानंतर त्यांना चंदीगडमधील सरकारी निवासस्थानातून अटक करण्यात आली.

आज सकाळी २० वाहनांमधून ईडीचे पथक अरोरा यांच्या घरी पोहोचले. गेल्या एका महिन्यातील अरोरा यांच्याविरोधातील ही ईडीची दुसरी कारवाई आहे. यापूर्वी त्यांच्या लुधियाना येथील ठिकाणांवरही छापे टाकण्यात आले होते. अरोरा यांच्याशी संबंधित काही कंपन्यांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय ईडीला आहे. या कंपन्यांमी १५७.१२ कोटी रुपयांची बनावट विक्री आणि शेल कंपन्यांच्या माध्यमातून खोट्या निर्यातीचे व्यवहार केल्याचा आरोप आहे. तसेच परदेशी संस्थांमार्फत पैशांची 'राउंड-ट्रिपिंग' करून फेमा नियमांचे उल्लंघन केल्याचा संशय आहे. या प्रकरणात ईडीने अनेक बँक खाती जप्त केली असून काही डीमॅट खाती आणि म्युच्युअल फंड गुंतवणूकही गोठवण्यात आली आहे. ईडीने गुरुवारी मोहाली आणि चंदीगडमधील सुमारे १२ ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले होते. मोहालीतील वेस्टर्न टॉवर्स सोसायटीमध्ये आयटी व्यावसायिक नितीन यांच्या फ्लॅटवरही कारवाई करण्यात आली होती.

## माझ्या आईचे कातडे वापरता का?
## मातृदिनी पेटाच्या रोबोट वासराचा सवाल

**चामड्याच्या वस्तू वापरू नये यासाठी सातत्याने जनजागृती करणाऱ्या पिपल फॉर एथिकल ट्रिटमेंट ऑफ ॲनिमल्स, इंडिया (पेटा) या संस्थेने यंदा मातृदिनाच्या पूर्वसंध्येला पुण्यात एक अनोखा प्रयोग केला. पेटाने गायीच्या वासराचे तोंड असलेला एक चार पायांचा रोबोट रस्त्यावर उतरवला. हे रोबोट वासरू येणाऱ्या-जाणाऱ्यांना एक निरागस सवाल विचारत होते, तुम्ही माझ्या आईचे कातडे वापरता का? रोबोट वासराचा हा सवाल ऐकून पायात चामड्याचे बूट-चप्पल, कंबरेला चामड्याचा पट्टा, खिशात चामड्याचे पाकीट किंवा हातात महागड्या ब्रँडची चामड्याची पर्स घेतलेल्या लोकांना क्षणभर आपण चुकतो आहोत, याची जाणीव होते.**



■ पुणे

**थ्रीडी** प्रिंटींग तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेल्या वासराचे तोंड हुबेहुब खऱ्या वासरासारखे दिसत होते. या रोबोट वासराची आणखी एक कमाल म्हणजे त्याच्यासमोर येऊन कोणी सांगितले की, आपण चामड्याच्या वस्तू बिलकूल वापरत नाही, की वासरू नाचून आनंद व्यक्त करत होते. या अनोख्या उपक्रमाबद्दल पेटा इंडियाचे क्रिएटिव्ह हेड उत्कर्ष गर्ग संस्थेची भूमिका मांडताना सांगितले की, तुम्ही चामड्याचे जॅकेट, बूट,पाकीट अशा वस्तू वापरता, त्यासाठी गायी-म्हशींची » पान २ वर

## युद्धाचा तेल कंपन्यांना जबर फटका
## दरमहा ३० हजार कोटींचे नुकसान

■ नवी दिल्ली

**मध्यपूर्वेत** सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात इंधन तेलाचा भडका उडाला आहे. कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. अशा परिस्थितीत देशात पेट्रोल-डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचे दर स्थिर राखण्याच्या सरकारच्या धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांना अतोनात नुकसान सहन करावे लागत आहे. दररोज ७०० ते १००० कोटी रुपये, म्हणजे दरमहा सुमारे ३० हजार कोटी रुपयांचे नुकसान या कंपन्या मुकाट्याने सहन करत आहेत.

मध्यपूर्वेत इराणविरूद्ध इस्त्रायल आणि अमेरिकेने युद्ध छेडल्यापासून जगाचा तेलपुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे जपानपासून ब्रिटनपर्यंत देशांनी



पेट्रोल-डिझेलच्या किमतीत सरासरी ३० टक्क्यांची वाढ केली आहे. मात्र भारतात मात्र पेट्रोल-डिझेलच्या किमती दोन वर्षांपूर्वी होत्या तेवढ्यावरच » पान २ वर

## रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची पुन्हा निवड

■ सातारा

**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांची रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा बिनविरोध निवड झाली आहे. २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी तेच संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. राज्यसभा निवडणुकीनंतर खासदारकीची शपथ घेतल्यानंतर काही काळ आजारी असल्याने शरद पवार सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर होते. साताऱ्यातील कार्यक्रमातून त्यांनी पुन्हा सक्रिय कामकाजाला सुरुवात केली. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी केवळ एकच अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर बोलताना पवार यांनी संस्थेच्या पुढील वाटचालीबाबत स्पष्ट भूमिका मांडली.

# चंद्रपूरचा रंग बदलू लागला

- गडचिरोलीचे वनवैभव की उद्योजकांची भूक?
- विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी!

- बंडू धोतरे

**ऊस गोड लागला म्हणून तो मुळासकट खायचा नसतो, ही म्हण आज गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्याच्या बाबतीत तंतोतंत लागू पडत आहे. एकेकाळी घनदाट जंगले, आदिवासी संस्कृती आणि निसर्गसमृद्ध प्रदेश 'ऑक्सिजन हब' म्हणून ओळखला जाणारा हा परिसर आज लोहखनिजाच्या धुळीने काळवंडला आहे. जंगल कापून लोह खाण मंजुरीची बातमी वाचली की काळजात धस्स होते. गडचिरोलीतील आणखी ९३७ हेक्टर संरक्षित वनजमीन 'लॉईड्स' कंपनीला खाणकामासाठी बहाल करण्यात आली आहे. २३४२ एकरचे समृद्ध जंगल आणि १ लाख २३ हजार वृक्षाची जंगलतोड! हा विकास आहे की विनाशाचे आमंत्रण?**

गडचिरोलीला 'स्टील हब' बनवण्याचे स्वप्न दाखवले जात आहे, पण वास्तवात या जिल्ह्याची 'राख रांगोळी' करण्याचा चंग बांधला गेल्यासारखे वाटते. ज्या जंगलांनी पिढ्यानपिढ्या आदिवासींना आश्रय दिला, ज्या नद्यांनी या भूमीची तहान भागवली, त्या आज यंत्रांच्या ओरखड्यांनी जखमी होत आहेत. स्थानिक स्टील प्रकल्पांना जेवढ्या खनिजाची गरज नाही, त्यापेक्षा कितीतरी पट अधिक उपसा केला जात आहे. प्रश्न असा पडतो की, मोठमोठ्या उद्योजकांकडून येथे फक्त एक-दोन स्टील प्रकल्प दाखवून त्यासाठी खनिज उत्खनन म्हणत, जर हे खनिज देशात इतरत्र आणि देशाबाहेर निर्यात करण्यासाठी दिघी बंदरांपर्यंत पाईपलाईनने नेले जाणार असेल, हजारो ट्रक आणि रेल्वे याने लूट करायची असेल तर यात स्थानिकांचा काय फायदा? हा विकास केवळ उद्योजकांच्या तिजोरी भरण्यासाठी आहे का? आणि याला निसर्गाची राखरांगोळी आणि फक्त लूट म्हणावी लागेल. यावर सरकारची भूमिका स्पष्ट असायला पाहिजे. येथील उद्योगांना खाणपट्टे देताना आपली मनमानी करण्यास, निसर्गाची हानी करून फक्त आपला स्वतःचा विकास करण्याचे खुले लाइसेन्स नसावे.

**चंद्रपूर आणि गडचिरोली: प्रदूषण आणि अपघातांचे मरण**

सुरजागडमधील उत्खननाचे भीषण परिणाम आज सर्वांसमोर आहेत. निसर्गसंपन्न असलेला गडचिरोली जिल्हा आता शापित होतो आहे, निळेशार पाणी वाहून नेणारे नद्या, ओढे आता लाल होऊ लागले आहे, येथील जीवांच्या फुफ्फुसे सुद्धा लाल होऊन लोह सूक्ष्मकणाने जड होऊ लागले आहे, यापासून होणारे आजार यावर उपचार महाग असल्याने, ज्यांचे हातावर पोट आहे त्यांना मात्र या शापित प्रदेशाचे आता नरकयातनांना सामोरे जावे लागेल हे मात्र सत्य आहे. पण त्रास फक्त गडचिरोलीपुरता मर्यादित नाही. शेजारचा चंद्रपूर जिल्हा या जड वाहतुकीने होरपळून निघाला आहे. दिवस-रात्र धावणारे हजारो ट्रक्स, खराब झालेले रस्ते, उडणारी लाल धूळ, वाहतुकीने मोडलेले कंबरडे, खिळखिळे होत चाललेली हाडे आणि वाढते श्वसनाचे विकार ही आज येथील सामान्य माणसाची नियती बनली आहे. आता तर चंद्रपूरच्या मुल शहरात मालधक्का (रेल्वे सायडिंग) करण्याची तयारी सुरू आहे. मात्र याच लोहमार्गालगतच यापूर्वी तयार करण्यात आलेले याच लोह खनिज मालधक्का असलेल्या केळझरची





अवस्था पाहिली की कळते की जिथे लोडिंग-अनलोडिंग होते, तिथे जगणे किती असह्य होते. या लाल जीवघेण्या प्रदूषणमुळे स्थानिकांचे आरोग्य, शेती आणि जंगल भागसुद्धा प्रदूषित झाले आहे. प्रकल्प एका बाजूला आणि त्याचा त्रास त्या जिल्ह्यासह दुसऱ्या जिल्ह्याला, ही कसली न्यायव्यवस्था?

**शाश्वत विकासाचा विसर**

उद्योगाचे धोरण हे जनतेच्या हिताचे असावे, त्यांना आजार देणारे नसावे. गडचिरोली म्हणजे निसर्गरम्य जंगल, डोंगर आणि बारमाही वाहणाऱ्या नद्यांचे दुसरे कोकणच! जिथे वैनगंगा, इंद्रावती आणि प्राणहिता सारख्या नद्या या भूमीचे पाय धुतात आणि दंडकारण्याचा हा भाग आपल्या अंगाखांद्यावर जैवविविधता खेळवतो, पण हे कोकण केवळ निसर्गापुरते मर्यादित नाही, तर ते इथल्या आदिम संस्कृतीच्या वारशाने नटलेले आहे. मडिया-गोंड संस्कृतीची नाळ जिथे थेट निसर्गाशी जोडली गेली आहे, अशा या भूमीत झाडापानांना देव मानले जाते. येथील प्रत्येक डोंगर एक इतिहास सांगतो आणि प्रत्येक नदी या भूमीची जीवनरेखा होऊन वाहते. इथे पर्यटन वाढवता आले असते, वनोपज प्रक्रियेचे उद्योग उभारता आले असते, आदिवासी संस्कृती जपून शाश्वत रोजगाराची मॉडेल तयार करता आले असते. मात्र, निसर्ग ओरबाडून काढणे हाच एकमेव मार्ग सरकारला दिसत आहे. ज्या वेगाने जंगल कापले जात आहे, त्या वेगाने आपण पर्यावरणाचे संतुलन कायमचे गमावून बसू.

**नागरिकांचे हक्क आणि आमची भूमिका**

संविधानाने प्रत्येक नागरिकाला शुद्ध हवा, पाणी आणि सन्मानाने जगण्याचा हक्क दिला आहे. लोहखनिजाची ही जीवघेणी वाहतूक आणि वाढते खाण प्रकल्प या हक्कांची पायमल्ली करत आहेत. केवळ दुर्गम, आदिवासी, जंगलाचा जिल्हाच्या 'विकासाच्या' नावाखाली स्थानिक लोकांच्या भावनांशी आणि आरोग्याशी खेळणे थांबायला हवे. जर खनिज स्थानिक उद्योगांसाठी हवे असेल, तर वाहतुकीची पर्यायी आणि सुरक्षित व्यवस्था का नाही? या लोह खनिजाची हजारो किमी लांबवर वाहतूक कुणासाठी आणि कशासाठी? आणि जर हे सर्व केवळ निर्यातीसाठी असेल, उद्योजकांच्या विकासासाठी असेल तर आमच्या जंगलांचा बळी का?

विकास हवा, पण तो मानवाच्या आणि निसर्गाच्या चितेवर रचलेला नसावा. आज गडचिरोली ओरबडली जात आहे, उद्या याचा परिणाम संपूर्ण राज्याला भोगावा लागेल. निसर्ग जपला तरच आपण जगू, हे विसरून चालणार नाही.

'विकास' विरोधात कोण असेल, आज सर्वांनाच भौतिक बाबीची गरज आहे, ते किती प्रमाणात याचा विचार झाला पाहिजे आणि विकास कसा, कुणासाठी? आणि कशा पद्धतीने? केला जावा याबाबतीत हा वाद असतो. त्यासाठी मोजली जाणारी किंमत ही 'निसर्ग' म्हणजेच 'पंचमहाभूते' जे आपले प्राण आहेत त्यालाच नष्ट करून करणार असू तर, मानव नाहीतर तर सर्व जीवसृष्टीच्या मूलभूत गरजा भागविण्याची जवाबदारी सुद्धा सरकारची नव्हे काय? ही निसर्ग संपदा शाश्वत पद्धतीने उपभोग घेण्याची गरज आहे. मात्र विकासाची भूक आम्हाला स्वस्थ बसू देत नाही आहे. स्थानिक गरजा आणि स्थानिक जैविविधता सांभाळून विकास करण्याची गरज आहे.

## सदावर्तेंच्या गाडीवर शाईफेक मनसे कार्यकर्ते ताब्यात

■ जालना

**जालना** शहरात वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर मनसे कार्यकर्त्यांनी शाई आणि सुपाऱ्या फेकल्या. यावेळी गाडीत सदावर्ते यांची पत्नी आणि मुलगी उपस्थित होत्या. मुंबईतील रिक्षाचालकांच्या मराठी-अमराठी वादाच्या पार्श्वभूमीवर सदावर्ते यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले. या शाईफेकीत मनसेचे जालना शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे व काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

## शिर्डी जमीन फसवणूक प्रकरणी भोंदू खरातला १४ दिवसांची कोठडी

■ अहिल्यानगर

**सिन्नर** महिला लैंगिक अत्याचार आणि फसवणूक प्रकरणातील मुख्य आरोप भोंदू अशोक खरातला शिर्डीतील जमीन खरेदी फसवणूक प्रकरणात राहता न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज त्याला न्यायालयात हजर केले होते. यावेळी शिर्डी पोलिसांनी पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. मात्र न्यायालयाने ती मागणी फेटाळून लावत खरातला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचा आदेश दिला.

अशोक खरात विरोधातील हा दहावा गुन्हा असल्याची माहिती आहे. तपासादरम्यान पोलिसांनी न्यायालयात सांगितले की, खरात चौकशीत पूर्णपणे सहकार्य करत नसून उडवाउडवीची उत्तरे देत आहे. गेल्या चार दिवसांत त्याने फरार असलेली पत्नी कल्पना खरातबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. तर न्यायालयीन सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी अशोक खरातला काही तक्रार आहे का? अशी विचारणा केली. त्यावर त्याने कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले.

## मराठवाड्यात ५०० च्या नोटांचा तुटवडा अंबादास दानवेंची हस्तक्षेपाची मागणी

■ छत्रपती संभाजीनगर

**मराठवाड्यात** ५०० रुपयांच्या नोटांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने बँकिंग व्यवहारांवर परिणाम होत असून, नागरिक आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. विशेषतः छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाडा विभागात रोख रक्कम काढण्यावर मर्यादा येत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने रोख पैशांची गरज मोठ्या प्रमाणात भासत आहे. कापड दुकाने, केटरर्स, मंगल कार्यालये आणि इतर व्यवहारांसाठी रोख रकमेची आवश्यकता असते. मात्र नोटांचा तुटवडा असल्याने वधू-वर पक्षासह सर्वसामान्यांची मोठी गैरसोय होत आहे. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीत गुंतलेल्या शेतकऱ्यांनाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. मशागत, बी-बियाणे आणि खत खरेदीसाठी रोख पैशांची गरज असताना ग्रामीण भागात नोटांची टंचाई जाणवत आहे. याबाबत अंबादास दानवे म्हणाले की , छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यातील बँकांमध्ये ५०० रुपयांच्या नोटांचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, यामुळे रोख पैसे काढण्यावर मर्यादा येत आहे. सध्या लग्नसराईचा काळ आणि शेतकऱ्यांच्या पेरणीपूर्व मशागतीचे दिवस असल्याने नागरिक अडचणीत आहेत.

## अखेर शक्तिपीठ महामार्गाच्या आरवणीत केला मोठा बदल

**अनेक तालुके वगळले**

■ नागपूर

**राज्यातील** नागपूर येथील पवनार ते सिंधुदुर्गमधील पत्रादेवी पर्यंतच्या शक्तिपीठ महामार्गाच्या संरेखनात बदल करण्यात आला आहे. याबाबतची अधिसूचना २८ फेब्रुवारी २०२४ मध्ये काढली होती. पण या महामार्गाला शेतकऱ्यांचा जोरदार विरोध झाला. यामुळे त्याच्या मार्गात बदल करण्यात आला. याची सुधारित अधिसूचना मंगळवारी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.

आधीच्या अधिसूचनेतील काही नोंदी वगळण्यात आल्या आहेत. हा महामार्ग वर्धा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून जाणार आहे. या महामार्गात येणारी गावे, जमिनीचा सर्व्हे क्रमांक, क्षेत्र याची माहिती अधिसूचनेत नमूद करण्यात आली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात हा महामार्ग आठ तालुक्यांतून जाईल. यासाठी ७८ गावांमध्ये भूसंपादन होईल. तर तीव्र विरोध झाल्यामुळे शिरोळ तालुका यातून वगळला आहे. हातकणंगले, पन्हाळा, करवीर, राधानगरी, कागल, भुदरगड, आजरा, चंदगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग, सावंतवाडी तालुक्यातून हा महामार्ग जाणार आहे. सांगली जिल्ह्यातील ४ तालुक्यांतील ३१ गावांच्या क्षेत्रातून हा महामार्ग जात आहे. मिरज, तासगाव, कवठेमहांकाळ आणि आटपाडी हे तालुके वगळले आहेत. येथील खानापूर, कडेगाव, पलूस आणि वाळवा तालुक्याच्या ३१ गावांचा यात समावेश करण्यात आला आहे.

पुढील काही दिवसांत या महामार्गासाठी भूसंपादनाची अधिसूचना काढणी जाण्याची शक्यता आहे. यात वर्धा, यवतमाळ, बीड, लातूर या जिल्ह्यांतील मूळ आखणी कायम ठेवण्यात आली होती. तर नांदेड, हिंगोली, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मूळ आखणीत बदल केला होता.

## नागपुरात दोन वेगवेगळ्या भागांत दोन विद्यार्थिनींच्या आत्महत्या

■ नागपूर

**नागपूर** शहरात दोन वेगवेगळ्या भागांत दोन विद्यार्थिनींनी आत्महत्या केल्याच्या धक्कादायक घटना उघडकीस आल्या आहेत. एका घटनेत अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या तरुणीने फ्लायओव्हरवरून उडी घेत जीवन संपवले तर दुसऱ्या प्रकरणात दहावीतील विद्यार्थिनीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. दोन्ही घटनांप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पहिली घटना पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. कलमेश्वर रोडवरील एका महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षाला शिकणारी १८ वर्षीय श्रीना गडपायले बुधवारी सकाळी ती नेहमीप्रमाणे कॉलेजला जाण्यासाठी घरातून बाहेर पडली. मात्र सायंकाळपर्यंत ती परतली नाही, त्यामुळे कुटुंबीय चिंतेत होते. रात्री उशिरा त्रिरपुडे रुग्णालयातून कुटुंबियांना फोन आला. कामठी रोडवरील व्हाईट हाऊसजवळील फ्लायओव्हरवरून उडी घेतल्याची माहिती देण्यात आली. गंभीर जखमी अवस्थेत तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. दुसरी घटना बजाजनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुरेंद्रनगर परिसरात घडली.

## म्हैसवर्गीय प्राण्यांचा धार्मिक वध देवनार पशुवधगृहातच

**ईदनिमित्त पालिकेची सूचना**

■ मुंबई

**मुंबई** महापालिका यंदा बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर देवनार पशुवधगृहात १७ ते ३० मे या कालावधीत जिवंत म्हैसवर्गीय प्राणी आणि बकऱ्यांचा बाजार भरवणार असून दरवर्षीप्रमाणे यंदाही म्हैसवर्गीय प्राण्यांचा धार्मिक वध केवळ देवनार पशुवधगृहातच करणे बंधनकारक आहे, अशी सूचना मुंबई पालिका प्रशासनाने केली आहे. मुंबईत इतरत्र कोठेही अशा प्राण्यांचा धार्मिक वध करता येणार नाही. अनधिकृपणे पशुवध करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पालिकेचे विविध विभाग आणि अन्य यंत्रणांकडून देवनार पशुवधगृह येथे करण्यात आलेल्या पूर्वतयारीबाबत पालिका मुख्यालयात नुकतीच आढावा बैठक पार पडली. यावेळी अतिरिक्त पालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले की, बकरी ईद सणाच्या निमित्ताने पालिकेच्या बाजार विभागामार्फत २८ ते ३० मे दरम्यान पालिका क्षेत्रात एकूण १०९ ठिकाणी धार्मिक पशुवधासाठी परवानगी देण्यात आली आहे.

या निर्देशित ठिकाणी किंवा इतर ठिकाणी धार्मिक पशुवध करायचा असल्यास त्याच्या परवानगी घ्यावी लागेल. त्यासाठी पालिकेच्यावतीने यंदा 'मायबीएमसी' मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये सुविधा उपलब्ध केली आहे. तसेच देवनार पशुवधगृहात ईदनिमित्त सीसीटीव्हीची नजर राहणार आहे. पाण्याचे नियोजन, आरोग्य सुविधा आणि साफसफाईची व्यवस्था करण्यात आली आहे.

## अकोल्यात वरातीत फटाक्यांच्या ठिणग्यांनी गाडी जळून खाक

■ अकोला

**अकोला** जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील कोठाळी बुद्रुक गावात लग्नाच्या वरातीत फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे गाडीने पेट घेतल्याने गाडी जळून खाक झाली. या घटनेमुळे वरातीत गोंधळ निर्माण झाला. गाडीतील प्रवासी वेळीच बाहेर पडले. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आग इतकी भीषण होती की संपूर्ण वाहन जळून खाक झाले. या घटनेत मोठे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती आहे. या लग्नाच्या वरातीत मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जात होते. याचदरम्यान काही ठिणग्या जवळ उभ्या असलेल्या गाडीमध्ये ठेवलेल्या फटाक्यांवर पडल्या. सुरुवातीला किरकोळ स्वरूपात लागलेली आग काही क्षणांतच भडकली आणि गाडीने पेट घेतला. आगीचा भडका उडाल्याने परिसरात धूर आणि फटाक्यांचे स्फोट सुरू झाले. या घटनेनंतर स्थानिकांनी तत्काळ आग विझवण्याचा प्रयत्न केला.

## मुंबईच्या महापौर निधीत तबबल १०० कोटींची वाढ

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात इतिहासातील सर्वाधिक २५० कोटी रुपयांचा 'महापौर विकास निधी' मंजूर करण्यात आला आहे. पूर्वी हा निधी १०० ते १७५ कोटींच्या घरात असायचा. तो यंदा १०० कोटींनी वाढवून अडीचशे कोटी करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, घनकचरा व्यवस्थापन, काँक्रिटीकरण आणि पूल विभागाच्या निधीत कपात करून तो निधी महापूर निधीकडे वळविला आहे. पालिकेच्या २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पीय खर्चाला सभागृहाने नुकतीच मंजुरी दिली. यामध्ये स्थायी समिती अध्यक्ष आणि सभागृह नेते यांच्या अतिरिक्त निधीमध्ये १५ टक्के कपात करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात स्थायीसाठी ८०० कोटींचा वाढीव निधी दिला आहे तर



स्थायी समितीच्या विकास निधीतून विरोधी पक्षाच्या नगरसेवकांची केवळ २५ लाखांवर बोळवण केली आहे सत्ताधारी पक्षातील नगरसेवकांना मात्र २ कोटी २५ लाखांचा निधी उपलब्ध केला आहे. यावेळी आर/उत्तर, आर/मध्य, आर/दक्षिण, पी/पश्चिम आणि पी/पूर्व विभागांतील विविध प्रभागांसाठी अतिरिक्त निधीची मागणी सभागृहात करण्यात आली.

## जळगावच्या प्राणी गणनेत तीन वाघांचे दर्शन घडले

■ जळगाव

**जिल्ह्यातील** बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने झालेल्या वन्यजीव गणनेत यंदा वाघांचे अस्तित्व दिसून आले आहे. वढोदा वनपरिक्षेत्रातील चारठाणा व डोलारखेडा या भागात ३ वाघांचे वास्तव्य आढळून आल्याने वन्यप्रेमींना ही वेगळी पर्वणी ठरणार आहे.



या परिसराला 'बनाना टायगर' नावाने ओळखले जाते. या वन्यजीव गणनेत हळदी-केळीच्या बागेत हे तीन वाघ दिसून आले. वढोदा वनपरिक्षेत्रातील चारठाणा व डोलारखेडा या भागात दाट जंगल, मुबलक पाणी आणि विस्तीर्ण केळीची शेती आहे. त्यामुळे हा परिसर वाघांसाठी सुरक्षित अधिवास मानला जात आहे. तसेच या परिसरात वाघांचे प्रजननही होत असल्याचे सांगितले जाते. वाघांसोबत बिबट्या, अस्वल, रानडुक्कर, सांबर आणि नीलगाय यासारख्या प्राण्यांची नोंद यंदाच्या प्राणी गणनेत करण्यात आली आहे.

**पश्चिम रेल्वे**

**उपहारगृहाचे व्यवस्थापन**

जगजिवन राम रुग्णालय (जेआरएच), मुंबई सेंट्रल, पश्चिम रेल्वे, मुंबई आमंत्रित करीत आहेत **सूचना क्र.: आरएलवायजेआरएच-कॅन्टीन-आरई-२०२६, कामाचे नाव:** जेआरएच, मुंबई सेंट्रल येथे पाच (५) वर्षांकरिता उपहारगृहामधून कॅटरिंग सेवांची तरतूद. **कामाचे अंदाजित मूल्य:** ₹ ४,६९,०००/-. **ईएमडी:** ₹ ९,४००/- **निविदेचे सादरीकरण रोजी किंवा त्यापूर्वी:** दि. २८.०५.२०२६ रोजी १५.०० वा. पर्यंत. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 0084

Like us on: facebook.com/WesternRly



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# गुन्हेगारी वाढवणारी शस्त्रांची मुबलकता

**राष्ट्रीय** गुन्हेगारी विभागाचा अहवाल नुकताच प्रकाशित झाला त्यामध्ये महिलांवरील अत्याचाराच्या टक्केवारीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे पहायला मिळाले. अगदी गेल्या वर्षभरातला महाराष्ट्रातल्या गुन्हेगारीचा आलेख हा सतत वाढत असल्याचे लक्षात येते. त्यातही बीड जिल्हा वरच्या क्रमांकावर राहिला त्यापाठोपाठ नाशिक,नागपूर, पुणे या शहरांनीही आपल्या गुन्हेगारीचे बालेकिल्लेही कायम ठेवल्याचे पाहायला मिळते. महाराष्ट्रातल्या सगळ्याच मोठ्या महानगरांमध्ये गुन्हेगारांच्या टोळ्या व्यवस्थितपणे कार्यरत राहिल्या. छुप्या पद्धतीने त्यांच्याकडून खंडणी वसुलीचे कामही सुरू राहिले. प्रत्येक शहरामध्ये कोयता गँग, तलवार गँग यासारख्या टोळ्या आपापली दहशत कायम ठेवण्यासाठी कार्यरत राहिल्या. नाशिक, पुणे, नागपूर यासारख्या भागात तर रात्रीच्यावेळी दुचाकी किंवा चारचाकी वाहनांची मोडतोड करणे, त्याला आगी लावणे यासारखे प्रकार करणारे गुन्हेगारही सक्रीय होते. आजही हे प्रकार छोट्या मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. जिथे गुन्हेगारांवर कायदा सुव्यवस्थेची दहशत असली पाहिजे. तिथे या गुन्हेगारांचीच स्वतःची दहशत निर्माण केली. अगदी ठाण्यातसुद्धा छोटे मोठे गुन्हे करणारे टोळके आपले उपद्व्याप सुरू ठेवतात आणि मुंबईत तर थेट पंजाबमधल्या बिष्णोई गँगने आपली वेगळीच दहशत निर्माण करायला सुरूवात केली आहे. सलमान खानच्या घरावर गोळीबार करण्याचा प्रकार आणि त्याचे पंजाबपर्यंत पोहचलेले धागेदोरे याचा अर्थ देशभरातल्या अनेक गुन्हेगारांना मुंबई आणि महाराष्ट्र अधिक सोयीचा वाटत असावा. विशेषतः मुंबईसारख्या आर्थिक राजधानीत खंडणी उकळणे हे या मोठ्या गुन्हेगारी टोळ्यांना खूपच सोयीचे वाटते आणि कुठेतरी ही खंडणीची कमाई चालू राहात असल्यानेच आपली दहशत कायम ठेवण्याचा प्रयत्न या गुन्हेगारी टोळ्या करतात. जिल्हा किंवा मोठ्या शहरांमधल्या टोळ्यांनादेखील स्थानिक राजकीय आश्रय मिळतो. म्हणूनच या गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. खरे तर या वाढत्या गुन्हेगारीवर शिक्कामोर्तब करणारा शस्त्रसाठा नांदेडमध्ये पकडला गेला. राज्यातला आतापर्यंतचा तो सर्वात मोठा शस्त्रसाठा असल्याचे म्हटले जाते. ज्यामध्ये धारदार अशा ४ हजार ७९७ वेगवेगळी शस्त्र जप्त केली आहेत. ज्याची किंमत ही ४३ लाख ४८ हजार म्हणजे जवळपास ४४ लाख होते आहे.

### महाराष्ट्रातला सर्वात मोठा शस्त्रसाठा

महाराष्ट्रातला हा आतापर्यंतचा मोठा शस्त्रसाठा असेल तर राज्यातली गुन्हेगारी का वाढते आहे याही प्रश्नाचे उत्तर त्यातून मिळून जाते. हा शस्त्रसाठा म्हणजेच राज्यातल्या शस्त्रतस्करीचे मोठे रॅकेट उघड करणाराही मानला जातो. यामध्ये धारदार तलवारी चाकू, गुप्ती यासारख्या शस्त्रांचा समावेश आहे. गुन्हेगारी दोन कारणांनी वाढीला लागत असते. एक म्हणजे त्यांना विनासायास आणि कमी किमतीत वेगवेगळी शस्त्र उपलब्ध होतात आणि दुसरे कारण म्हणजे गुन्हेगारांना मिळणारे राजकीय स्वरूपाचे संरक्षण शिवाय पोलीस दलाकडूनही सोयिस्करपणे केले जाणारे दुर्लक्ष हे या गुन्हेगारांसाठी फार मोठे आश्वासन ठरते. पुणे, नागपूर, नाशिक या शहरांवर थैमान घालणाऱ्या कोयता गँगला मिळणारी शस्त्र याच शस्त्रसाठ्याचाच परिणाम ठरतो. कारण या शस्त्रांना त्याप्रमाणात मागणी असल्याशिवाय इतका मोठा शस्त्रसाठा होऊ शकत नाही किंवा त्याची घाऊक तस्करीही होऊ शकत नाही. विशेष म्हणजे पोलिसांच्याच म्हणण्याप्रमाणे हा आतापर्यंतचा महाराष्ट्रातला सर्वात मोठा शस्त्रसाठा ठरतो. यापूर्वी काडतुसे, काही बंदुका वगैरे अशी शस्त्र सापडली होती परंतु त्यांचे प्रमाण इतके मोठे नव्हते. मराठवाड्यामध्ये होणारी संघटित गुन्हेगारी आणि त्याला मिळणारे राजकीय संरक्षण हा गेल्या वर्षातला चर्चेचा मोठा भाग होता आणि त्यातली बरीच बडी धेंडं आता कारागृहातही आहेत. विदर्भात वारंवार झालेल्या जातीय दंगलीत आणि तिथे वापरली जाणारी शस्त्रे याचा वापर केला तर हा शस्त्रसाठा म्हणजे गुन्हे अशाच समाजविघातक प्रवृत्तींनाही शस्त्रे उपलब्ध करून देण्याचेच मोठे कारस्थान म्हणता येते. ही शस्त्र येतात कुठून याचा तर शोध घेतला पाहिजेच परंतु तिचा वापर होणार हे नक्की असल्यानेच त्याची तस्करी किंवा साठे केले जातात हेही तितकेच खरे आहे. म्हणजेच आता या शस्त्रसाठ्याबरोबरच त्या शस्त्रांचा वापर करणारे हातही तितक्याच कठोरतेने शोधले पाहिजेत.

### दहशतीसाठीचे शस्त्र

गुन्हेगारी वाढण्याची इतर कोणतीही कारणे असली तरीसुद्धा सहजपणे शस्त्र उपलब्ध होणे हा त्यामागचा अतिशय महत्त्वाचा भाग ठरतो. तलवार गँग किंवा कोयता गँग हा प्रकार घाऊक शस्त्रसाठ्याचाच धोकादायक परिणाम आहे. कारण एकाचवेळी दहा बारा गुंड हातात तलवारी घेऊन मोटारगाड्यांच्या काचा फोडत फोडत आणि अनेक दुकानदारांवर ही शस्त्र उभारून दुकानांची लूटपाट करण्याचाही प्रकार करतात. या टोळ्यांशी नेमकी ठिकाणे पोलिसांना माहीत असतात. परंतु त्याचे मुळापासून उच्चाटन होत नाही. म्हणूनच एका विशिष्ट कालावधीनंतर गुन्हेगारीचा आलेख वाढतच जाताना दिसतो. शस्त्र परवाना सहजासहजी मिळत नाही आणि ज्या समाजकंटकांना कमी कालावधीत आपली मोठी दहशत निर्माण करायची असते त्यांना बरीच शस्त्र एकाचवेळी हवी असतात. आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दहशतीचे तंत्र वापरले जाते. परंतु त्या तंत्राकरीता आवश्यक असणारी शस्त्रे सहजपणे उपलब्ध करून देणाऱ्या बेकायदेशीर यंत्रणाही पाहायला मिळतात. हा शस्त्रसाठा शोधण्यात पोलिसांना यश आले. हे विशेष आहेच. परंतु अशा प्रकारचे शस्त्रसाठे राज्याच्या इतर भागातही असण्याच्या शक्यतेला यातून दुजोरा मिळतो. एकेकाळी बिहार, उत्तरप्रदेश या ठिकाणी असे बेकायदेशीर शस्त्र खुलेआमपणे वापरली जायची त्यातूनच अपहरण, खून दरोडे यासारखे प्रकार घडून आले. त्या राज्यांमध्येदेखील गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड होते. म्हणजेच शस्त्रांची मुबलकता हे गुन्हेगारीवाढीचे तितकेच महत्त्वपूर्ण कारण ठरते. अशा पद्धतीचे शस्त्रसाठे म्हणजे महाराष्ट्राला गुन्हेगारीतून अस्थिर करण्याचाही भाग असू शकतो.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आपल्यापेक्षा वरच्यांना पाहिले की वाटते, आपल्याकडे काहीच नाही. आपल्यापेक्षा खालच्यांना पाहिले की वाटते, आपल्याकडे खूप काही आहे.तुलना हे दुःखाचे मूळ कारण आहे.

## पंचांग

**रविवार, १० मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

**रवी उदय- ०६-०८**
**रवी अस्त- १९-०३**

*** वैशाख कृष्ण अष्टमी**
*** नक्षत्र : धनिष्ठा**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १२-१२ मकर**
**१२-१३ ते २४-०० कुंभ**

**तुंबरू जयंती; श्रीराम पट्टाभिषेक;जागतिक मदर्स डे**

## पाककृती



### मटण रोगन जोश



★ **साहित्य :** १/४, टेबलस्पून बडीशेप पावडर १/२ टेबलस्पून आल्याची पावडर, दीड टेबलस्पून काश्मिरी लाल मिरची पावडर, १ चिमूटभर केशर १/४ चमचा जिरे, ६ हिरवी वेलची, ४ दालचिनीच्या काड्या (लहान), ४ काळी वेलची, ५०० ग्रॅम मटण, मीठ चव घेण्यासाठी. १ चिमूटभर हिंग, २ टेबलस्पून तूप,१/४ चमचा हळद पावडर

★ **कृती:** एका बाऊलमध्ये हिंग, काश्मिरी मिरची पावडर, आले पावडर, बडीशेप पावडर आणि पाणी घालून चांगले मिसळा. दालचिनीच्या काड्या, हिरवी वेलची, जायफळ, जिरे एकत्र वाटून त्याची जाडसर पूड करून बाजूला ठेवा. एका पातेल्यात तूप गरम करून त्यात काळी वेलची घाला, मटणाचे तुकडे टाका, मटण तपकिरी रंगाचे होईपर्यंत मंद आचेवर शिजवा आणि त्यात काश्मिरी मिरची, केशर, पाणी आणि मीठ यांचे मिश्रण घाला. ते व्यवस्थित मिसळा. झाकण लावून मांस मऊ होईपर्यंत ४५ मिनिटे शिजवा. तयार केलेला मसाला पावडर घालून, चांगले मिसळा आणि ३० मिनिटे शिजू द्या.मटण रोगन जोश तयार झाले की नान आणि बासमती भातासोबत सर्व्ह करा.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेलः contact@navakal.in

**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## क्रीडा

# चेन्नई सलग तिसऱ्या विजयाच्या तयारीत

## आज लखनौच्या संघाशी दोन हात करणार

**चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियममध्ये उद्या होणाऱ्या आयपीएलच्या ५३ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात लढत होणार आहे. चेन्नईचा संघ सलग तिसरा विजय मिळवण्याच्या तयारीत आहे. या सामन्यासह चेन्नईला आगामी सर्व सामन्यांत विजय मिळवणे गरजेचे आहे. असे केल्यास चेन्नईला आयपीएलच्या प्लेऑफमध्ये प्रवेश मिळेल. तर लखनौचा संघ याआधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर आहे. त्यामुळे लखनौ औपचारिकता म्हणून सामना खेळणार आहे.**



■ चेन्नई

**लखनौने** आयपीएलच्या या हंगामात अतिशय खराब कामगिरी केली आहे. या संघाने आतापर्यंत १० सामने खेळले आहेत. त्यातील ३ सामन्यांत विजय मिळवला, तर ७ सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे लखनौ ६ गुणांसह आयपीएलच्या गुणतालिकेत अखेरच्या स्थानावर विराजमान आहे, तर चेन्नईने या हंगामात १० सामन्यांत आपले नशीब आजमवले आहे. त्यातील ५ सामन्यांत विजय आणि ५ सामन्यांत पराभव पत्कारावा लागला. परिणामी चेन्नई १० गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानावर आहे. लखनौचा संघ आयपीएलच्या इतर संघांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करेल. चेन्नईच्या आतापर्यंतच्या मोहिमेत सातत्याचा अभाव दिसून आला आहे. त्यांनी घरच्या आणि बाहेरच्या दोन्ही ठिकाणी खराब कामगिरी केली आहे. संघ आता घरच्या एमए चिदंबरम स्टेडियमला परतणार आहे. लखनौविरुद्ध पुन्हा एकदा लय मिळवण्याची त्यांच्याकडे एक उत्तम संधी आहे. चेन्नईची संपूर्ण मोहीम मोठ्या प्रमाणावर संजू सॅमसनभोवती फिरत राहिली आहे. त्याच्या आघाडीच्या फळीतील कामगिरीने अनेकदा संघाचे भवितव्य निश्चित केले आहे.

नवखा सॅमसन संघाच्या फलंदाजीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून उदयास आला आहे. कर्णधार ऋतुराज गायकवाड फलंदाजीमध्ये सातत्य राखण्यासाठी झगडत आहे. दोन अर्धशतकांसह ऋतुराजने फॉर्ममध्ये पुनरागमन केले आहे, पण दिल्लीविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात तो अपयशी ठरला.

### बंगळूरू-मुंबई भिडणार

रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह स्टेडियमवर उद्या पार पडणाऱ्या आयपीएलच्या ५४ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू आणि मुंबई इंडियन्स भिडणार आहे. हा सामना जिंकून बंगळुरु गुणतालिकेत अव्वल स्थान गाठण्यासाठी मैदानावर उतरणार आहे. तर मुंबईचा संघ याआधीच आयपीएलच्या प्लेऑफ शर्यतीतून बाहेर पडला आहे.

# भारतीय अंडर-१७ महिला फुटबॉल संघाची आगेकूच

**सूझोऊ-** अंडर-१७ महिला आशियाई फुटबॉल कपच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय महिला फुटबॉल संघाने पहिल्यांदाच प्रवेश केला. चीनमधील सूझोऊ येथे खेळल्या गेलेल्या शेवटच्या गट सामन्यात भारताने लेबनॉनला ४-० ने हरवले. प्रितिका बर्मनने दोन गोल केले, तर अल्वा देवी संजम आणि जोयाने प्रत्येकी एक गोल केला. भारताने गट टप्पा ३ गुणांसह संपवला आणि थायलंडसोबत 'सर्वोत्तम तिसऱ्या स्थानावरील' संघ म्हणून अंतिम आठमध्ये स्थान मिळवले. सहाव्या मिनिटात दिव्यानी लिंडाच्या लांब पासवर प्रितिका बर्मनने गोल करून भारताला १-०अशी आघाडी मिळवून दिली.

# महावितरणने ४ सांघिक विजेतेपद पटकावली

■ छत्रपती संभाजीनगर

**अखिल** भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महिला पुरुष गटातील कबड्डी आणि खो-खो तसेच कुस्तीमध्ये महावितरणने ४ सांघिक विजेतेपद आणि १ उपविजेतेपद मिळवत एकतर्फी वर्चस्व राखले.

पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील विद्युत कंपन्यांच्या ३ दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेचा समारोप झाला. दरम्यान, महावितरणच्या कबड्डी पुरुष संघाने बलाढ्य हिमाचल प्रदेश संघाचा अटीतटीच्या अंतिम सामन्यात पराभव करीत १५ वर्षांनंतर विजेतेपदाचा मान मिळवला. राष्ट्रीय स्पर्धेतील सर्व सांघिक व वैयक्तिक विजेत्यांना करंडक व प्रशस्तिपत्राने गौरविण्यात आले. विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या सांघिक विजेत्या व उपविजेत्या संघातील खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्राने संचालक दत्तात्रेय पडळकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, आयोजन समितीचे अध्यक्ष सुनील काकडे, उपाध्यक्ष अनिल कोलप आदींची उपस्थिती होती. उपांत्य फेरीमध्ये प्रतिस्पर्धी संघावर मात करत मागील वर्षीचा विजेता हिमाचल विरुद्ध महावितरण संघ यंदाही आमनेसामने आले.

# आयपीएल खेळाडूंना रील्स बनवण्यास बंदी

■ मुंबई

**खेळाडू,** त्यांचे कुटुंबीय आणि ब्रॉडकास्टरसाठी काम करणारे माजी क्रिकेटपटू आयपीएल सामन्यादरम्यान रील्स बनवू शकणार नाहीत किंवा सोशल मीडियावर पोस्टही करू शकणार नाहीत. नियम मोडल्यास बीसीसीआय दंड आणि कायदेशीर कारवाई करू शकते.

बीसीसीआयने आयपीएलमध्ये भ्रष्टाचारविरोधी आणि सुरक्षा व्यवस्थेबाबत खेळाडू, समालोचक, त्यांचे कुटुंबीय आणि ब्रॉडकास्टरसाठी सोशल मीडियावरील सामग्रीबाबत कठोर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. बीसीसीआयने म्हटले की, संवेदनशील ठिकाणी रील्स किंवा व्हिडिओ बनवणे पूर्णपणे प्रतिबंधित राहील. बीसीसीआयच्या भ्रष्टाचारविरोधी युनिटने (एसीयू) या हंगामात नियमभंगाची अनेक प्रकरणे पकडली. यामध्ये खेळाडू आणि ब्रॉडकास्टर म्हणून काम करणारे माजी क्रिकेटपटू देखील समाविष्ट आहेत. बीसीसीआयने इशारा दिला की, सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन न करणाऱ्यांवर मोठा दंड आणि कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# यशस्वी जैस्वाल आणि शेफालीला नाडाची नोटीस

**नवी दिल्ली-** भारतीय सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि शेफाली वर्मा यांना राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने (नाडा) गेल्या वर्षी डोप चाचणीसाठी उपलब्ध नसल्याबद्दल नोटीस बजावली. या खेळाडूंनी नाडाला त्यांच्या ठिकाणांची माहिती दिली नव्हती. यशस्वी आणि शेफाली नाडाच्या रजिस्टर्ड टेस्टिंग पूलचा भाग आहेत. नियमानुसार या पूलमध्ये सामाविष्ट असलेल्या खेळाडूंना दररोज एक निश्चित वेळ आणि ठिकाणाची माहिती सामायिक करावी लागते. जेणेकरून त्यांची अचानक चाचणी करता येईल. या दोन्ही खेळाडूंनी चाचणी चुकल्याचे कोणतेही ठोस कारण सांगितले नाही.

# भारतीय कुस्ती महासंघाची विनेश फोगाटला नोटीस

■ नवी दिल्ली



**गैरशिस्त** आणि उत्तेजक विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून भारतीय कुस्ती महासंघाने कुस्तीपटू विनेश फोगाटला कारणे दाखवा नोटीस बजावली. महासंघाच्या उत्तेजक विरोधी नियमांनुसार निवृत्तीतून परतल्यानंतर आवश्यक असलेला ६ महिन्यांचा नोटीस कालावधी न दिल्यामुळे तिला जून २०२६ पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरवण्यात आले.

डब्लूडब्लूने पत्रात हे देखील स्पष्ट केले आहे की, विनेशला कुस्तीमध्ये परत यायचे असेल, तर तिने किमान सहा महिने आधी आयटीए किंवा आंतरराष्ट्रीय महासंघाला कळवले पाहिजे आणि या कालावधीत उत्तेजकविरोधी चाचणीसाठी उपलब्ध राहिले पाहिजे. वाडा नियम ५.६.१ नुसार, कोणताही खेळाडू दीर्घ कालावधीसाठी चाचणी प्रणालीतून बाहेर राहिल्यानंतर थेट स्पर्धेत भाग घेऊ शकत नाही. असे केल्यास त्यांचे निकाल अवैध घोषित केले जाऊ शकतात.

# जोकोविचचा पहिल्या फेरीत पराभव

## इटालियन टेनिस ओपनमधून बाहेर

■ रोम

**सहा** वेळा इटालियन ओपन चॅम्पियन राहिलेला नोव्हाक जोकोविच जागतिक क्रमवारीत ७९ व्या क्रमांकावर असलेल्या डारियो प्रिझमिककडून पराभूत झाल्यामुळे इटालियन ओपनच्या स्पर्धेतून बाहेर पडला. पहिला सेट गमावल्यानंतर प्रिझमिकने जोरदार पुनरागमन करत दुसरा आणि तिसरा सेट जिंकून सामना आपल्या नावावर केला. प्रिझमिकने जोकोविचला २-६, ६-२, ६-४ असे हरवून स्पर्धेतून बाहेर काढले.

जोकोविचने पहिला सेट अवघ्या ४० मिनिटांत जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये त्याला ती लय टिकवता आली नाही. त्याची अचूकता कमी झाली. क्रोएशियन खेळाडू डारियो प्रिझमिकने दबाव कायम ठेवत २४ वेळच्या ग्रँड स्लॅम विजेत्याला अधिक चुका करण्यास भाग पाडले आणि सामना निर्णायक तिसऱ्या सेटमध्ये नेला. त्याने प्रिझमिकवर दबाव आणून त्याच्याकडून चुका घडवून आणण्याचा वारंवार प्रयत्न केला, परंतु त्या प्रिझमिकने आपला बचाव कायम ठेवला आणि आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय मिळवला.

# डोंबिवलीच्या बॉईज क्लबला ठाणे प्रीमियर लीगचे विजेतेपद

■ ठाणे




**उत्कंठतापूर्ण** लढतीत डोंबिवलीच्या बॉईज क्रिकेट क्लबने एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब संघावर १० धावांनी सरशी मिळवत महाराष्ट्र माझा सेवा संस्थेने युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आयोजित १४ ठाणे प्रीमियर लीग उपमुख्यमंत्री चषक टी -२० क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. प्रथम फलंदाजी करताना १७९ धावांचे आव्हान उभे केल्यावर एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबला निर्धारित षटकांमध्ये १६९ धावांवर रोखत बॉईज क्रिकेट क्लबने पहिल्यांदाच स्पर्धेच्या विजेतेपदावर आपली मोहर उमटविली. स्पर्धेत एका शतकासह सव्वा दोनशेहून अधिक धावा करणाऱ्या बॉईज क्रिकेट क्लबच्या अनिश चौधरीला सामन्यासह स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरवण्यात आले. प्रथम फलंदाजी करताना सृजन आठवले, जय जैन आणि दशरथ चव्हाणने छोट्या पण उपयुक्त खेळी करत संघांच्या धावसंख्येला आकार दिला. सृजनने ४६, जयने ४१ आणि दशरथने ३९ धावांचे योगदान दिले. मोहित अवस्थीने ४, शशिकांत कदमने ३ बळी मिळवले. उत्तरादाखल डावाची डळमळीत सुरुवात झाल्यानंतर साईराज पाटील, सागर मिश्रा आणि सिद्धार्थ म्हात्रेने किल्ला लढवत सामन्यातील रंगत कायम राखली. साईराजने ३७, सागरने ४५, सिद्धार्थने नाबाद ३९ धावा बनवल्या. साहिल फेगडे आणि यश सिंगने प्रत्येकी २ फलंदाज बाद केले.

देश विदेश

# दिल्ली-फरिदाबाद दरम्यान नवीन मेमू ट्रेन धावणार

■ नवी दिल्ली



**दिल्ली** आणि फरिदाबाद दरम्यान दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नवीन मेमू ट्रेन मिळणार आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या मागणीनंतर रेल्वे मंत्रालयाने नवीन मेमू ट्रेन सेवेला मंजुरी दिली, ज्यामुळे दिल्ली आणि फरिदाबादसह आजूबाजूच्या परिसरातील लोकांना प्रवासासाठी आणखी एक पर्याय मिळाला आहे.

या निर्णयाबद्दल मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्र्यांचे आभार मानले. त्यांनी नमूद केले की, फरिदाबाद आणि आसपासच्या परिसरातील मोठ्या संख्येने लोक रोजगार, शिक्षण आणि इतर कामांसाठी दररोज दिल्लीला ये-जा करतात. अतिरिक्त आणि सुधारित रेल्वे सेवेची बऱ्याच काळापासून मागणी होती, ज्याला आता मंजुरी देण्यात आली. दिल्ली सरकार सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारसोबत मिळून काम करत आहे. या गाड्या साधारणपणे ताशी १०० ते ११० किलोमीटर वेगाने धावतात आणि त्या रोज प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी आणि नोकरदार लोकांसाठी खूप उपयुक्त मानल्या जातात. आधुनिक मेमू गाड्यांमध्ये एलईडी दिवे, जीपीएस-आधारित माहिती प्रणाली, बायो-टॉयलेट्स आणि सीसीटीव्ही यांसारख्या सुविधा देखील असतील.

# इंडोनेशियात ज्वालामुखीत होरपळून ३ जणांचा मृत्यू

■ जकार्ता

**इंडोनेशियातील** 'माउंट डुकानो' या सक्रिय ज्वालामुखीच्या परिसरात हृदयद्रावक घटना घडली. 'नो-गो झोन'चे उल्लंघन करून डोंगर चढणाऱ्या २० गिर्यारोहकांपैकी तिघांचा ज्वालामुखीच्या उद्रेकात होरपळून मृत्यू झाला.

इंडोनेशियाच्या हलमहेरा बेटावर असलेल्या माउंट डुकानो ज्वालामुखीचा अचानक मोठा उद्रेक झाला. या उद्रेकामुळे सुमारे १० किलोमीटर उंचीपर्यंत राख आणि धुराचे लोट हवेत पसरले होते. ज्यावेळी हा स्फोट झाला, तेव्हा ज्वालामुखीच्या विवराजवळ २० गिर्यारोहक उपस्थित होते. या दुर्घटनेत दोन सिंगापूरचे पर्यटक आणि एका स्थानिक नागरिकाचा मृत्यू झाला. डिसेंबर महिन्यापासूनच 'सेंटर फॉर वोल्केनोलाजी अँड जिओलॉजिकल हॅझार्ड मिटिगेशन'ने या भागात भूकंपीय हालचाली वाढल्याची नोंद केली होती. पर्यटकांना ज्वालामुखीच्या विवरापासून ४ किलोमीटर अंतरापर्यंत न जाण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या.

# जपानमध्ये विद्यार्थिनींनी वापरलेल्या उवाबाकी बुटांची हजारोंना विक्री

■ टोकियो

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**जपानमध्ये** शालेय विद्यार्थिनींनी वापरलेल्या उवाबाकी (इनडोअर बूट) च्या ऑनलाईन विक्रीने मोठा वाद निर्माण झाला आहे. टोकियोसह विविध भागांत हा ट्रेंड वाढत असून, सोशल मीडियावर यावर टीका होत आहे.

जपानमध्ये स्वच्छता आणि शिस्तीला विशेष महत्त्व असल्याने शाळांमध्ये बाहेरील चप्पल वापरण्यास मनाई असते. विद्यार्थी शाळेत प्रवेश करताना हलके, पांढऱ्या रंगाचे 'उवाबाकी' बूट वापरतात. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर जुने साहित्य विकण्याची प्रथा असली तरी, अलीकडील काही प्रकारांनी चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. विशेषतः मुलींची नावे लिहिलेले, जास्त वापरलेले आणि घासलेले बूट हजारो रुपयांना विकले जात असल्याचे समोर आले आहे. सायटामा प्रांत येथे एका जोडीची किंमत सुमारे ६,९०० येन ठेवण्यात आली होती, तर काही लिलावांमध्ये ही किंमत ५०,००० येन (२६ हजार रुपयांहून अधिक) पर्यंत गेली आहे.

# नारायणपुरात आयटीबीपीचे वाहन उलटले! २ जवान गंभीर

■ रायपूर



**नारायणपूर** जिल्ह्यात रस्त्याच्या बांधकामाच्या पाहणीसाठी निघालेल्या आयटीबीपीच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा अपघात झाला. कोडनारजवळ घडलेल्या या घटनेत ६ जवान जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोघे गंभीर जखमी आहेत.

आयटीबीपीचे जवान अबुझमद येथील मंदोडा कॅम्पमध्ये तैनात आहेत. ते रस्ते सुरक्षा पथकाचा भाग आहेत. ते मंदोडा रस्त्यावर नियमित गस्त आणि सुरक्षा कर्तव्यावर होते. रस्त्याच्या बांधकामाच्या पाहणीवेळी वाहन मंदोडा कॅम्पच्या दिशेने जात होते. एका चढणीजवळ चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. ज्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. त्यात दोन जवान गंभीर जखमी झाले असून त्यांना प्रथमोपचारानंतर नारायणपूर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# गोव्यात लवकरच 'वॉटर मेट्रो' ७ मार्गांवर आधुनिक टॅक्सी बोटी

■ पणजी

**केरळच्या** धर्तीवर गोव्यातही लवकरच 'वॉटर मेट्रो' टॅक्सी सेवा सुरू करण्याच्या हालचाली वेगाने सुरू झाल्या असून राज्य सरकारकडून केंद्र सरकारला यासंदर्भातील प्रस्ताव पाठविण्याची तयारी सुरू आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला नदी परिवहन मंत्री सुभाष फळदेसाई, कोची मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक लोकनाथ बेहरा, नदी परिवहन खात्याचे संचालक विक्रमसिंह राजे मोसले तसेच सल्लागार गिरीश पवार उपस्थित होते. बैठकीदरम्यान गोव्यात वॉटर मेट्रो सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक तांत्रिक, प्रशासकीय आणि वाहतूक व्यवस्थापनाशी संबंधित विविध बाबींचा आढावा घेण्यात आला. या बैठकीनंतर मंत्री सुभाष फळदेसाई यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे गोव्यातील जलवाहतूक अधिक आधुनिक, पर्यावरणपूरक आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर होणार आहे. सध्या राज्यात जलवाहतुकीद्वारे दरवर्षी सुमारे ४७ हजारांहून अधिक लोक

# कॅनडात विद्यार्थी व्हिसा फसवणूक रोखण्यासाठी कडक नियम

■ ओटावा



**कॅनडा** सरकारने पीआर आणि विद्यार्थी व्हिसाच्या नावाखाली होणारी फसवणूक रोखण्यासाठी नवे कडक नियम लागू करण्याचा निर्णय घेतला. हे नियम १५ जुलै २०२६ पासून लागू होणार आहेत. नवीन नियमांनुसार परवानाधारक इमिग्रेशन सल्लागारांकडून फसवणूक झाल्यास पीडितांना सरकारी भरपाई मिळणार आहे. दोषी एजंट्सवर ९ कोटी रुपयांपर्यंत दंड आणि ६ महिने ते २ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

इमिग्रेशन, रिफ्युजीज अँड सिटिझनशिप कॅनडाच्या अहवालानुसार २०२४-२५ मध्ये १० हजार बनावट प्रवेशपत्रे उघडकीस आली होती. यापैकी जवळपास ८० टक्के प्रकरणे पंजाब आणि गुजरात येथील विद्यार्थ्यांशी संबंधित होती. कॅनडातील काही प्रांतांनी फूड आणि सर्व्हिस सेक्टरला प्राधान्य यादीतून वगळल्याने त्या क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पीआर मिळण्यावरही परिणाम होणार आहे. त्यामुळे पंजाबी आणि गुजराती विद्यार्थ्यांमध्ये चिंता वाढली. फसवणुकीच्या बळींना मदत करण्यासाठी सरकारकडून भरपाई निधी उभारला जाणार आहे. परवानाधारक सल्लागाराने चुकीची माहिती देऊन आर्थिक नुकसान केल्यास पीडित या निधीतून भरपाई मागू शकतील. याशिवाय एप्रिल २०२७ पासून सर्व इमिग्रेशन सल्लागारांची ऑनलाइन सार्वजनिक यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# टाटा पॉवर कंपनी भूतानमध्ये जलविद्युत प्रकल्प उभारणार

■ नवी दिल्ली

**स्वच्छ** ऊर्जा क्षेत्रात भारत-भूतान सहकार्याला मोठे बळ मिळाले आहे. टाटा पॉवर भूतानमधील ड्रुक ग्रीन पॉवर कॉर्पोरेशनसोबत मिळून १,१२५ मेगावॅट क्षमतेचा 'दोरजिलुंग' जलविद्युत प्रकल्प उभारणार आहे. नोव्हेंबर २०२५ मधील करारानुसार, कुरिछू नदीवर होणारा हा प्रकल्प सप्टेंबर २०३१ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. त्यातून निर्माण होणारी ८० टक्के वीज भारताला पुरवली जाणार आहे.

टाटा पॉवर आणि ड्रुक ग्रीन पॉवर कॉर्पोरेशन यांनी ४७४ मेगावॅट क्षमतेच्या 'न्येरा अमारी १ आणि २ एकात्मिक जलविद्युत प्रकल्पासाठीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या दोन्ही कंपन्यांच्या संयुक्त भागीदारी अंतर्गत एकूण जलविद्युत क्षमता ४,५०० मेगावॉटवरून थेट ५,०३३ मेगावॉटपर्यंत वाढली. भूतानने २०४० पर्यंत २५,००० मेगावॉट वीजनिर्मितीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले असून हा प्रकल्प त्या दिशेने मोठा टप्पा मानला जात आहे.

# ऐन उन्हाळी पर्यटन हंगामात माथेरानमध्ये तीव्र पाणीटंचाई

■ माथेरान

**सध्या** उन्हाळी पर्यटन हंगाम सुरू असताना माथेरानवासीयांना पाण्याच्या जटील समस्येला तोंड द्यावे लागत असल्याने माथेरानकर आक्रमक झालेले दिसत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ढिसाळ कारभारामुळे ही समस्या उद्भवल्याचा आरोप करत नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांसह विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक सचिन दाभेकर, किरण पेमारे, वसंत कदम, सीताराम शिंदे आदीं थेट जल शुद्धीकरण केंद्रावर जाऊन धडक दिली.

नेरळ येथील उल्हास नदीतून पाण्याचा उपसा केला जात आहे. याठिकणी ३ पंप बसविण्यात आले असून नदीतनू २४ तास पाणी काढले जात आहे.जुम्मापट्टी येथे १६ तास पंपिंग होत असतानाही इथे फक्त दहा तास का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मागील दोन दिवस माथेरानमध्ये फक्त ८ तास पंपिंग केली आहे. माथेरान लेकची पंपिंग बंद असून ३२ फूट पाणीसाठा शिल्लक आहे.

# तिकीट तपासणीसाठी लोकलमध्ये रात्रीच्या वेळी बॅटमन पथके तैनात



■ मुंबई

**रात्रीच्या** लोकल प्रवासात वाढलेल्या विनातिकीट प्रवाशांना आळा घालण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. आता रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत चर्चगेट ते विरार दरम्यान लोकल गाड्यांमध्ये विशेष तिकीट तपासणी मोहीम राबवली जाणार असून, यासाठी बॅटमन पथके थेट तैनात करण्यात येणार आहेत.

एप्रिल महिन्यात पश्चिम रेल्वेकडून ३ लाख ६० हजारांहून अधिक विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करण्यात आली. या विक्रमी कारवाईनंतरही रात्रीच्या वेळी विनातिकीट प्रवासाचे प्रमाण वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर प्रशासनाने ही मोहीम अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या रात्री ९ वाजेपर्यंतच तिकीट तपासणी होत असल्याने अनेक प्रवासी त्याचा गैरफायदा घेत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आता बॅटमन (बी अवेअर टीटीई मॅनिंग अॅट नाईट) पथके रात्री उशिरापर्यंत म्हणजे शेवटच्या लोकलपर्यंत आणि सकाळी पहिल्या गाडीचीही तपासणी करतील. पश्चिम रेल्वेवर सुमारे १४१४ लोकल फेऱ्यांमधून दररोज जवळपास ३० लाख प्रवासी प्रवास करतात. त्यांची आता दिवसरात्र तपासणी केली जाणार आहे.

# साताऱ्यात ५० फूट दरीत ट्रक कोसळला ! चौघांचा मृत्यू

■ सातारा

**सातारा** तालुक्यातील कासरतळे येथे काल रात्री एक ट्रक उतारावरून ५० फूट दरीत कोसळून भीषण अपघात झाला. यामध्ये एका चिमुकल्यासह ३ महिलांचा मृत्यू झाला. तर दोन जण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. जखमींवर सातारा जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मृतांमध्ये सिताराम आडागळे, कल्पना सागर आवळे (३५), गार्गी आवळे (६) आणि लिलाबाई आडागळे (६०) यांचा समावेश आहे.

कासरतळे परिसरातील एका कुटुंबाचे पुनर्वसन झाल्यानंतर ते दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्याच्या तयारीत होते. रात्री उशिरा रस्त्याच्या कडेला ट्रक उभा करून सामान चढवण्याचे काम सुरू असताना अचानक ट्रकचे नियंत्रण सुटले आणि तो रस्त्यालगतच्या ५० फूट खोल दरीत कोसळला. या ट्रकमध्ये घरगुती सामानासह काही पाळीव जनावरेही होती. अपघातात काही जनावरांचाही मृत्यू झाल्याची माहिती आहे.

# शिंदेसेनेत गेल्यानंतरही दिव्यांग प्रश्नावरून बच्चू कडू आक्रमक

**सरकारला आंदोलनाचा इशारा**

■ मुंबई



**शिंदेसेनेत** प्रवेश करून अवघ्या दहा दिवसांत विधान परिषदेवर निवडून आलेले बच्चू कडू यांनी दिव्यांगांच्या प्रश्नावर पुन्हा एकदा आक्रमक झाले. राज्यातील दिव्यांग आणि नेत्रहीन बांधवांना संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान गेल्या काही महिन्यांपासून मिळत नसल्याने त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना इशारा दिला. सरकारने याबाबत तातडीने दखल घेतली नाही तर १९ तारखेला मंत्रालयात आंदोलन छेडण्याचा इशारा कडू यांनी दिला आहे.

राज्य सरकारकडून ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या नागरिकांना संजय गांधी निराधार योजनेतून दरमहा अडीच हजार रुपयांचे मानधन दिले जाते. मात्र फेब्रुवारीपासून हजारो दिव्यांगांना हे अनुदान मिळाले नसल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. नेत्रहीन नागरिकांना घरभाडे, वीजबिल आणि दैनंदिन खर्च भागवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील सुमारे ५० नेत्रहीन बांधवांनी मुख्यमंत्री सचिवालय गाठून व्यथा मांडली. या प्रकरणावर बच्चू कडूंनी सरकारवर निशाणा साधत, यूटीआय कार्डच्या अटीमुळे अनेक दिव्यांग मानधनापासून वंचित राहत असल्याचा आरोप केला.

# कॅनरा बँक फसवणूक प्रकरणी गोव्यात 'ईडी'चे ६ ठिकाणी छापे

■ पणजी

**गोव्यातील** कॅनरा बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने मोठी कारवाई केली असून मे.क्राऊन मिनरल ट्रेडिंग कॉर्पोरेशनशी संबंधित गोव्यातील ६ ठिकाणी छापेमारी केली आहे. या छापेमारीत ईडीने ६२.५ लाखांच्या रोकडसह मालमत्तेची कागदपत्रे आणि डिजिटल उपकरणे जप्त केली आहेत.

क्राऊन मिनरल ट्रेडिंग कॉर्पोरेशनने कॅनरा बँकेच्या मडगाव शाखेतून ७ कोटींचे कर्ज बनावट कागदपत्रे सादर करून घेतले होते. हे कर्ज खाते नंतर थकीत झाले असून, बँकेची ६.१९ कोटींची थकबाकी आहे. तपासात असेही उघड झाले आहे की, कंपनीने ज्या मालमत्ता कॅनरा बँकेकडे गहाण ठेवल्या होत्या, त्याच मालमत्ता इतर बँकांकडे गहाण ठेवून अतिरिक्त १० कोटींहून अधिक कर्ज घेतले होते. या फसवणुकीची पहिली तक्रार २४ डिसेंबर २०२१ रोजी बँकेचे तत्कालीन महाव्यवस्थापक व कर्नाटक मंडल प्रमुख रामा नाईक यांनी दाखल केली होती. त्यानंतर सीबीआयने ३१ मार्च २०२२ रोजी गुन्हा दाखल केला होता.

# दहावीत मराठीत ८० हजार विद्यार्थी नापास ! इतर भाषेचा निकाल अव्वल

■ मुंबई

**राज्यात** रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची करण्याच्या मुद्यावरून राजकीय आणि सामाजिक वातावरण तापलेले असताना, दुसऱ्या बाजूला राज्यातील विद्यार्थ्यांची मराठी भाषेतील घसरलेली कामगिरी ही चिंतेचा विषय ठरत आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात मराठी विषयात तब्बल ८० हजार ८०३ (सुमारे ७ टक्के) विद्यार्थी नापास झाले आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीचा ऑनलाईन निकाल जाहीर केला. यंदा राज्याचा एकूण निकाल ९२ टक्क्यांच्या घरात गेला असून, तब्बल १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागल्याने आनंदाचे वातावरण आहे. या यशाच्या छायेत मराठी विषयातील अनुत्तीर्णांची आकडेवारी धक्कादायक ठरत आहे. प्रथम भाषा म्हणून मराठीचा अभ्यास करणाऱ्या १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ८० हजार ८०३ विद्यार्थी नापास झाले आहेत. तसेच, द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी निवडलेल्या ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांपैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी अनुत्तीर्ण ठरले आहेत.

# चंदूरमध्ये कोट्यवधी खर्चूनही रस्त्यात खड्ड्यांचे साम्राज्य

**हातकणंगले** - चंदूर गावातील रस्ते म्हणजे खड्डेच खड्डे चोहीकडे, रस्ते गेले कुणीकडे अशी म्हणायची वेळ नागरिकांवर आली आहे. त्यामुळे भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. या गावातील रस्त्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आला. तात्पुरते का असेना रस्ते चकाचक झाले. परंतु निकृष्ट कामामुळे व कामाच्या दर्जामुळे रस्ते खराब झाले. या रस्त्यांची अक्षरशः चाळणच झाली आहे. सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे.या गावातील महादेव मंदिर नदीजवळील ते आभारफाटापर्यंत सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे.पण कामाचा दर्जा निकृष्ट आहे.तसेच चंदूर ओढा ते आभार फाटा डांबरी रस्त्याची पूर्ण चाळण झाली आहे.

# ढेबेवाडीच्या वांग खोऱ्यात फुलवली सफरचंदाची बाग

■ कराड

**पाटण** तालुक्यातील ढेबेवाडी परिसरातील वांग खोऱ्यात असलेल्या मानेगाव येथील प्रगतशील शेतकरी अधिकराव माने

**मानेगावचे शेतकरी माने यांचा शेती प्रयोग**

आणि त्यांचे पुत्र विजय माने यांनी सफरचंदाची यशस्वी बाग फुलवली आहे. सुमारे दहा गुंठ्यांत मूळची मुरबाड जमीन लागवडीसाठी तयार करून त्यांनी ही सफरचंदाची बाग फुलवली आहे.

विशेष म्हणजे प्रगतशील शेतकरी अधिकराव माने यांनी या आपल्या विशेष शेती प्रयोगासाठी सफरचंदाची रोपे काश्मीर आणि हिमाचल प्रदेशातून आणली होती. दुर्गम आणि डोंगराळ भागात सफरचंद बहरल्याने या प्रयोगाची परिसरात चर्चा सुरू झाली आहे. पारंपरिक पिकांना फाटा देत नवीन काहीतरी करण्याचा प्रयत्न माने यांनी नेहमीच केला आहे. ही बाग सातारा जिल्ह्यातील डोंगरी भागात सफरचंदाची शेती शक्य असल्याचे दाखवून देते.

**जाहीर सूचना**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, आमचे अशील हरखचंद तलाक्षी सावला, चारु हरखचंद सावला, केतन मावजी छेडा, सतिश दामजी मारु, जगदीश वेलजी शाह, सरला जगदीश शाह, छत्रभूज छगनलाल शर्मा, अर्जून मुरलीधर शर्मा, अर्पिता मेहूल शाह, हर्ष मेहुल शाह, भावना जयेश छेडा, किरन मावजी छेडा, प्रविणा किरण छेडा, भरत प्रेमराज पुरोहित, चंचलबेन लखमशी छेडा, राजकुमार जवाहरमल गुप्ता आणि पूनम राजकुमार गुप्ता हे अनुसूचीत मालमत्तेच्या अभिहस्तांतरण दिनांक ०९.११.२०२३ आणि १३.०५.२०२५ नुसार ५०% संयुक्त सह-मालक आहेत. मालमत्तेचे उर्वरित ५०% सह-मालक निलन रणजित गोरागांधी आणि सुनिल रणजित गोरागांधी हे आहेत.

भाडेकरू/रहिवासी आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी आमच्या अशिलाच्या लेखी परवानगीशिवाय केवळ भाडे भरू नये आणि निलन रणजित गोरागांधी आणि सुनिल रणजित गोरागांधी यांच्याशी व्यवहार करू नये.

**मालमत्तेची अनुसूची**

टीपीएस III, एस.व्ही. रस्ता आणि एल.टी. रस्त्याचा संगम, बोरिवली (पश्चिम), एमएसडी येथे स्थित अंतिम भूखंड क्र. १०३/ए (भाग), सर्व्हे क्र. २४३, हिस्सा क्र. २ (भाग) येथील १६६४.५९ चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीच्या तुकड्यावरील ५०% अविभाजित हक्क, शीर्षक आणि हितसंबंध; तसेच लगतच्या एस.व्ही. रोडच्या रुंदीकरणासाठी (दिनांक १२.०७.२००५ च्या महानगरपालिका पत्रांनुसार) बृमुंमपाच्या मालकीहक्काखाली गेलेल्या ४४३.२३ चौ.मी. जमिनीच्या भागाच्या बदल्यात मिळणारे टी.डी.आर. / नुकसानभरपाईचे हक्क; त्यावर उभ्या असलेल्या, ४९ भाडेकरू व्यावसायिक युनिटधारकांचा ताबा असलेल्या संरचना.

**दिनांक:** १०.०५.२०२६

सही/-
पियुष शाह अ‍ॅण्ड असोसिएट्स,
अ‍ॅडव्होकेट्स अ‍ॅण्ड सॉलिसिटर,
महेंद्र के. शाह,
पियुष महेंद्र शाह,
अ‍ॅडव्होकेट आणि सॉलिसिटर,
इंग्लंड अ‍ॅण्ड वेल्स
४०६, हमाम हाऊस, हमाम स्ट्रीट, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

# राजूरच्या विद्यार्थ्याला प्रत्येक विषयात ३५ गुण मिळाले



■ अहिल्यानगर

**दहावीचा** निकाल जाहीर होताच गुणवंत विद्यार्थ्यांची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात रंगली आहे. मात्र आता अकोले तालुक्यातील राजूर येथील एका विद्यार्थ्याच्या आगळ्यावेगळ्या निकालाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

राजूर येथील गुरुवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्यामंदिर या शाळेचा विद्यार्थी सुशांत मच्छिंद्र रोंगटे याने दहावी परीक्षेतील सर्वच्या सर्व सहाही विषयांत नेमके ३५ गुण मिळवत अनोखा योगायोग साधला आहे.

मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र या प्रत्येक विषयात सुशांतला समान आणि तेही काठावरील गुण मिळाले आहेत. दहावीच्या परीक्षेत प्रत्येक विषयात ३५ गुण मिळणे, ही दुर्मीळ गोष्ट असल्याने परिसरात त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. सोशल मीडियावरही सुशांतच्या या निकालाच्या विविध मिष्कील आणि कौतुकास्पद पोस्ट व्हायरल होत आहेत.

# एचआयव्ही संक्रमित अनाथ बालकांची दहावीत यशस्वी भरारी

■ लातूर

**जिल्ह्यातील** हासेगावच्या सेवालय बालगृहातील एचआयव्ही संक्रमित अनाथ विद्यार्थ्यांनी दहावी बोर्डाच्या परीक्षेत उज्ज्वल यशाचे सर्वोच्च शिखर गाठले आहे.या शाळेतील १० विद्यार्थ्यांनी तब्बल ८८ टक्क्यांपर्यंत गुण मिळविण्याची कमाल आहे. सेवालय बाल गृहातील दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गायत्री काळे - ८८.८८ टक्के, श्रावणी ऐनलावर- ८८ टक्के,आरती नरवडे- ७५.८० टक्के, वैष्णवी भाकरे -७३.६० टक्के, सविता जाधव- ७०.४० टक्के,पूजा हिवराळे- ६१ टक्के, कृष्णा मासुळे -५४.८० टक्के, गणेश गायकवाड-५३ टक्के, गायत्री मठपती-४७.४० टक्के, सुनील तिगोटे- ४१.६० टक्के आदींचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# बाळासाहेब ठाकरे यांच्यावर लवकरच विशेष टपाल तिकीट

**मुंबई- यंदाचे** वर्ष शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त विशेष टपाल तिकीट जारी करून भारतीय टपाल विभाग अनोखी आदरांजली वाहणार आहे. यासंदर्भात माजी खासदार राहुल शेवाळे यांनी मागणी केली होती. या मागणीवर टपाल विभाग सकारात्मक विचार करत असून तसे पत्रच केंद्र सरकारकडून शेवाळे यांना पाठवले आहे. भारतीय टपाल विभागातील उपमहासंचालक कार्यालयाकडून शेवाळे यांना प्राप्त झालेल्या पत्रात म्हटले आहे की, फिलाटेल (संग्रह) विभागाच्या सल्लागार समितीच्या आगामी बैठकीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकीट जारी करण्याबाबत चर्चा करण्यात येईल.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the original Share Certificate No. 38, bearing distinctive numbers from 161 to 165 (comprising 5 shares of Rs. 50/- each issued by Nehru Nagar Unnati Co-op. Housing Society Ltd. having its registered office at Bldg. No. 74, Nehru Nagar, S.G. S. G. Barve Marg, Kurla (E) Mumbai-400024(Reg.No. BOM (W.L)/HSG(OH)/7581/93-94), standing in the name of Smt.Swati Makrand Lalit and Jyoti Rajesh Karandikar in respect of Flat No.2534 on the 4th Floor of the said Society's building, has been lost, misplaced or misplaced beyond tracing. The said member has applied to the Society for the issuance of a Duplicate Share Certificate in respect of the said flat.
Any person(s), bank, or financial institution having any claim, right, title, or interest in respect of the said Share Certificate or the said Flat by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, inheritance, possession, lease, lien, or otherwise, is hereby required to notify the same in writing, supported by documentary evidence, to the Hon. Secretary of the Society at the address mentioned above within 14 days from the date of publication of this notice. If no claim or objection is received within the stipulated period of 14 days, the Society shall be free to proceed with issuing a Duplicate Share Certificate in favour of the aforementioned member, and any subsequent claims/objections will not be entertained and shall be deemed to have been waived.
For and on behalf of
Nehru Nagar Unnati Co-op. Housing Society Ltd.
Sd/-
Hon.Secretary
Place: Mumbai
Date: May 7, 2026

Email- contact@navakal.in
navakaloffcial ▸ www.navakal.in
पुणे ■ रविवार १० मे, २०२६
६
नवाकाळ
विजय



# चिनी 'मायाजालात' अडकली हतबल अमेरिका

**पूर्वी अमेरिका सागरी वर्चस्व गाजवत होती आणि चीन याचक होता. अमेरिका आजही बलवान असली तरी चीन आता 'बँकर' झाला आहे, ज्याची ताकद विमानवाहू युद्धनौकांना सहज पराभूत करण्यास सक्षम आहे. विदेशी बँकांकडील अमेरिकन कर्जरोखे हा अहवाल आणि हिल्टन गोळीबारानंतरच्या अर्ध्या तासातील संवाद पुस्तिका (कम्युनिकेशन लॉग) आता सार्वजनिक झाले आहेत. श्रीलंकेचे हंबनटोटा बंदर, पाकिस्तानचे ग्वादर बंदर, म्यानमारचे कोको आयलँड आणि मालदीवमधील बेटांची कर्जबाजारी अवस्था पाहता, भारत या चिनी आर्थिक मायाजालात अडकला नाही याबद्दल सध्याच्या सरकारची प्रशंसा करायला हवी. चीनच्या या विळख्यात अडकून हतबल झालेली अमेरिका हे त्याचे नवीन सावज बनले आहे.**

**२५ एप्रिल** २०२६ ला व्हाईट हाऊस कॉरेस्पॉन्डंटस् डिनरमध्ये अमेरिकन राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत गोळीबार झाला. त्यानंतरच्या सहा तासांमधील नाट्यमय घडामोडींचे सखोल विश्लेषण ना जनतेने केले, ना पेंटागनने किंवा प्रसार माध्यमांनी. गोळीबाराच्या वेळी झालेल्या सुरक्षा यंत्रणेच्या अपयशावरच सर्वांचे लक्ष केंद्रित झाले होते, त्यामुळे त्या सहा तासांतील बाँड होल्डर्स गेम दुर्लक्षित राहिला. गोळीबारानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या वल्गना शिगेला पोहोचल्या होत्या. सूत्रांनुसार, त्यांनी पहिला फोन अमेरिकन जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफला केला आणि त्याच वेळी 'द टाइम फॉर टॉक्स इज ओव्हर' असा धमकीवजा संदेश 'ट्रूथ सोशल' या सोशल मीडियावर टाकल. त्यानुरूप पीट हेगसेथ यांनी इराणची दोन तेल शुद्धीकरण केंद्रे (ऑईल रिफायनरीज) आणि तीन आयआरजीसी मुख्यालयांवर तात्काळ प्रतिहल्ला (रिटॅलिएटरी स्ट्राईक्स) करण्याचे आदेश जारी केले. अमेरिकन नौसेनेच्या विमानवाहू जहाजांचे ताफे (करियर ग्रुप्स) पर्शियन गल्फजवळील हार्मोझ सामुद्रधुनीकडे सरकू लागले आणि आता काय होणार या भीतीने जगाचे श्वास रोखले गेले.

पण एकाएकी, कोणालाही भनकदेखील लागू न देता, हल्ल्याचे आदेश चुपचाप मागे घेण्यात आले. विमानवाहू ताफ्यांनी लष्करी माघार घेतली. अमेरिकन प्रसारमाध्यमांनी या माघारीला 'सिक्युरिटी प्रोटोकॉल टू सिक्युअर होमलँड फर्स्ट' असे गोंडस नाव दिले. परंतु जागतिक अर्थतज्ज्ञांच्या मते, मध्यपूर्वेतील या लष्करी माघारीमागे एका अति प्रभावशाली आर्थिक हत्याराची भीती होती. वॉशिंग्टन गोळीबारानंतर उडालेल्या प्रशासकीय आणि राजकीय धुरळ्याचा त्वरित फायदा घेऊन चीनने अमेरिकेवर एक अभूतपूर्व आणि अकल्पित आर्थिक वार केला. यामुळे अमेरिकेच्या मध्यपूर्वेतील क्षेत्रीय वर्चस्वाला जबरदस्त हादरा बसला. तो समजून घेण्यासाठी गेल्या अडीच दशकांत चीनने अमेरिकेच्या जागतिक डॉलर वर्चस्वाभोवती कसा चातुर्यपूर्वक फास आवळला, याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

सूत्रांनुसार, अमेरिका इराणवर हल्ला करणार याची कुणकुण लागताच चीनने अमेरिकेला एक तांत्रिक अधिसूचना (टेक्निकल नोटिफिकेशन) जारी केली. ती युद्धाची धमकी नव्हती, तर आम्ही अमेरिकन ट्रेझरी बाँडमध्ये केलेल्या ७७५ कोटी डॉलर्सच्या गुंतवणुकीचे त्वरित रोख रकमेत रुपांतर करू इच्छितो असा तो संदेश होता. अर्थशास्त्रात याला 'लिक्विडिटी रिव्ह्यू' म्हणतात, ज्याचा अर्थ आपल्या गुंतवणुकीचे बाजारमूल्य न गमावता त्वरित रोख रकमेत रुपांतर करणे असा होतो. १९६० च्या शीतयुद्धानंतर चिनी राष्ट्रपती माओत्से तुंग यांनी अमेरिकेत आर्थिक गुंतवणूक सुरू केली होती. चीनला स्वतःच्या निर्यात आणि चलन क्षमता वृद्धीसाठी अमेरिकन ट्रेझरीच्या डेट बाँडस्‌मध्ये गुंतवणूक करणे भाग आहे, अशी खात्री अमेरिकन अर्थतज्ज्ञांना वाटत होती.

मात्र, चीनने अमेरिकन अर्थस्थितीचे परीक्षण करून आढावा घेणे सुरू केले होते. अमेरिकन डेट बॉण्डस्‌मध्ये गुंतवणूक केल्यानंतर वाचलेल्या रकमेतून चीनने सोने खरेदी करून प्रचंड मोठे 'गोल्ड रिझर्व्ह' उभे केले आणि आगामी आर्थिक पर्यायांची मुहूर्तमेढ रोवली. अमेरिकन लिक्विडिटी रिव्ह्यू हा त्याचाच परिपाक आहे. सूत्रांनुसार, चीनने संदेश दिला की, यापुढे इराणच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर एक जरी अमेरिकन क्षेपणास्त्र पडले तरी तो जागतिक सुरक्षेला मोठा धोका मानला जाईल. उत्तरादाखल आम्ही पुढील बारा तासांत बाजार सुधारणा (मार्केट करेक्शन) करण्यासाठी अमेरिकेचे १०० कोटी डॉलर्सचे कर्जरोखे खुल्या बाजारात विक्रीसाठी आणू. मोठ्या प्रमाणातील या विक्रीमुळे बाँडस्‌च्या किमती १० ते २० टक्क्यांनी कोसळून बाजार आपली स्वयंसुधारणा करेल. यामुळे इतर गुंतवणुकदारही नफा वसुलीसाठी विक्री करतील आणि किमती अजूनच खाली येतील, ज्यामुळे प्रचंड अस्थिरता (निर्माण होईल.



कर्नल अभय पटवर्धन
(निवृत्त)

चीनने असे केल्यास अमेरिकेला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. रातोरात बँकांचे व्याजदर वाढले असते, मॉरगेज रेट्स दुप्पट झाले असते आणि डॉलरची बाजार किंमत किमान १५ टक्क्यांनी घसरली असती. अमेरिकन सेंट्रल बँकेने पेंटागनला सज्जड इशारा दिला असेल की, तुमची विमाने बॉम्ब टाकून परत येण्याआधी अमेरिकन बँकिंग प्रणालीची पूर्ण वाताहत (टोटल कोलॅप्स) झालेली असेल. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या लष्करी हल्ल्याच्या पर्यायाला इराणी क्षेपणास्त्रांनी नव्हे, तर आर्थिक खात्यांनी सुरुंग लावला, हे वास्तव आहे.

ट्रम्प हल्ल्याचे आदेश देत असतानाच चीनने 'सार्वभौम विमा सापळा' (सॉव्हेरिन इन्शुरन्स ट्रॅप) नावाचे दुसरे अस्त्र बाहेर काढले. सागरी वाहतुकीसाठी जहाज कंपन्यांना विमा काढावाच लागतो. फेब्रुवारीपूर्वीपर्यंत पाश्चात्य विमा कंपन्या असे कवच देत असत, पण हार्मोझ सामुद्रधुनी बंदीदरम्यान त्यांनी विमा उतरवणे बंद केले. परिणामी, चीनने जाहीर केले की हार्मोझमधून जाणाऱ्या प्रत्येक जहाजाचा सार्वभौम विमा आम्ही काढू. हा चीनने निर्माण केलेला एक वैधानिक गतिरोध (लीगल स्टेलमेट) आहे. चिनी विमा कवच असलेली जहाजे ताब्यात घेणे म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार चीनच्या सार्वभौमत्वावर हल्ला ठरतो. चीनने धमकी दिली की, जर तुम्ही आमचे जहाज ताब्यात घेतले तर आम्ही ५ कोटी डॉलर्सची मानहानीची रक्कम आणि जहाजावरील तेलाच्या किमतीएवढे तुमचे कर्जरोखे बाजारात विकून आमची आर्थिक नुकसान भरपाई करून घेऊ. या दबावामुळे अमेरिकन नौसेना कर्जरोख्यांखाली निष्क्रिय झाली आहे.

२०२५ मधील संघर्षाच्या वेळी अमेरिकन अर्थखात्याने इशारा दिला होता की, इराणशी युद्ध सुरू झाल्याच्या ४८ तासांनंतर अमेरिकन

>>> रविवार विशेष

अर्थव्यवस्थेचा साप्ताहिक कर्जरोखे लिलाव बंद होऊन त्यांना 'झिरो लिक्विडिटी इव्हेंट'ला तोंड द्यावे लागेल. हा लिलाव होऊ शकला नाही तर १९४१ नंतर पहिल्यांदाच अमेरिकेला आर्थिक डबघाईचा सामना करावा लागेल. 'ब्लॉकिंग स्टाच्युट' अंतर्गत चीनने आपल्या जहाजांना अमेरिकन निर्बंधांचे पालन करण्यास मनाई करून मोठा धक्का दिला आहे. ट्रम्प यांच्याकडे आता केवळ चीनचे हे आव्हान (ब्लफ) स्वीकारून इराणवर हल्ला करण्याचा मार्ग उरला आहे. संरक्षण तज्ज्ञांनुसार, चीन डेट ट्रॅपचा पूर्ण वापर करणार नाही, कारण त्यांनाही अमेरिकन ग्राहक हवा आहे. हा एक प्रकारे 'म्युच्युअली ॲश्युअर्ड डिस्ट्रक्शन' फॉर्म्युला आहे. १४ मे २०२६ ला ट्रम्प चीनला जाणार आहेत, त्याआधी त्यांना चीनला आजमावणे आवश्यक आहे. चीनने 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' अंतर्गत आपला ग्राहक वर्ग विस्तारला असून आपले धोरणात्मक तेल साठे (स्ट्रॅटेजिक ऑईल रिझर्व्ह) १२ दशलक्ष बॅरल्सपर्यंत नेले आहे. हे युद्ध जितके लांबेल तितकी पेट्रोडॉलर सिस्टीम कमकुवत होईल आणि डॉलरचे 'वर्ल्ड रिझर्व्ह करन्सी स्टेटस' मातीमोल होईल.

चीनच्या या कुटिल चालीमुळे अमेरिकेची अवस्था 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झाली आहे. आगामी काळात अमेरिकन १० वर्षीय ट्रेझरी बाँड्‌सचा व्याजदर (जो सध्या ५.५ टक्के आहे) जर अचानक वाढू लागला, हार्मोझमधून चिनी जहाजे बिनदिक्कत जात राहिली किंवा १४ मे च्या बैठकीत कर्जरोखे बाजारात समन्वयाची चर्चा झाली, तर समजावे की अमेरिका चीनच्या आर्थिक विळख्यात पूर्णपणे अडकली आहे. पूर्वी अमेरिका सागरी वर्चस्व गाजवत होती आणि चीन याचक होता. अमेरिका आजही बलवान असली तरी चीन आता 'बँकर' झाला आहे, ज्याची ताकद विमानवाहू युद्धनौकांना सहज पराभूत करण्यास सक्षम आहे. विदेशी बँकांकडील अमेरिकन कर्जरोखे हा अहवाल आणि हिल्टन गोळीबारानंतरच्या अर्ध्या तासातील संवाद पुस्तिका (कम्युनिकेशन लॉग) आता सार्वजनिक झाले आहेत. श्रीलंकेचे हंबनटोटा बंदर, पाकिस्तानचे ग्वादर बंदर, म्यानमारचे कोको आयलँड आणि मालदीवमधील बेटांची कर्जबाजारी अवस्था पाहता, भारत या चिनी आर्थिक मायाजालात अडकला नाही याबद्दल सध्याच्या सरकारची प्रशंसा करायला हवी. चीनच्या या विळख्यात अडकून हतबल झालेली अमेरिका हे त्याचे नवीन सावज बनले आहे.

●●●

# 'राजशिष्टाचार' फेररचनेचा अन्वयार्थ

**महाराष्ट्र सरकारने अलीकडेच प्रशासकीय कामकाज आणि राजशिष्टाचाराच्या पद्धतीत केलेल्या बदलामुळे राज्याच्या राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. २८ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आलेल्या दुरुस्ती प्रस्तावानुसार, एखादा लोकप्रतिनिधी न्यायालयीन खटल्यात दोषी ठरलेला असेल, एखाद्या प्रकरणात आरोपी असेल किंवा निवडणुकीशी संबंधित प्रक्रियेसाठी शासकीय कार्यालयात येत असेल, तर अधिकाऱ्यांनी त्याच्या स्वागतासाठी उभे राहणे किंवा विशेष सन्मान करणे आवश्यक राहणार नाही. या निर्णयामुळे दीर्घकाळापासून चालत आलेल्या प्रशासकीय प्रथेला पहिल्यांदाच स्पष्ट अपवाद जोडण्यात आला आहे.**

नरेंद्र क्षीरसागर

यापूर्वी २० नोव्हेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, आमदार किंवा खासदार शासकीय कार्यालयात आल्यास अधिकाऱ्यांनी उभे राहून त्यांचे स्वागत करणे आणि त्यांच्या प्रस्थानावेळी सन्मानपूर्वक निरोप देणे बंधनकारक मानले जात होते. मात्र नव्या दुरुस्तीनंतर सरकारने स्पष्ट केले की, प्रत्येक परिस्थितीत हा प्रोटोकॉल लागू राहणार नाही. विशेषतः कायदेशीर चौकशी, न्यायालयीन प्रक्रिया किंवा निवडणूक कामकाजाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींना विशेष वागणूक देण्याची आवश्यकता नाही. प्रशासकीय यंत्रणेची निष्पक्षता आणि संस्थात्मक प्रतिष्ठा जपण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

या बदलामागील मुख्य विचार म्हणजे अधिकाऱ्यांचे वर्तन परिस्थितीनुसार संतुलित असावे. एखादा लोकप्रतिनिधी चौकशी, सुनावणी किंवा न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सरकारी कार्यालयात येत असेल, तर त्याला सामान्य नागरिकांप्रमाणेच वागणूक दिली जावी, असा सरकारचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे पदाच्या आधारावर स्वयंचलित सन्मान देण्याऐवजी परिस्थिती आणि संदर्भ यांना महत्त्व देण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून येतो.

हा निर्णय प्रशासकीय निष्पक्षतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. कायदा सर्वांसाठी समान आहे, हा संदेश समाजात अधिक ठळकपणे पोहोचू शकतो. लोकप्रतिनिधी असला तरी तो कायद्याच्या चौकटीबाहेर नाही, ही जाणीव दृढ करण्यासाठी अशा प्रकारचे निर्णय आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. काही विरोधी पक्षांनीही या निर्णयाचे स्वागत केले असून, दोषी किंवा आरोपी असलेल्या व्यक्तींना औपचारिक सन्मान देणे नैतिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मात्र या निर्णयावर टीकाही होत आहे. काहींच्या मते, दोषी किंवा आरोपी याची नेमकी व्याख्या स्पष्ट नसल्याने व्यावहारिक अडचणी निर्माण होऊ शकतात. कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय अंतिम मानला जाणार का, अपील प्रलंबित असेल तर काय भूमिका घेतली जाईल, चौकशी किंवा सुनावणीची मर्यादा किती असेल, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अस्पष्टता राहिल्यास या नियमांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीतीही व्यक्त होत आहे. या निर्णयाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रशासकीय कार्यसंस्कृतीत होत असलेला बदल. दीर्घकाळापासून लोकप्रतिनिधींना औपचारिक सन्मान देणे ही प्रशासकीय संस्कृतीचा भाग राहिला आहे. मात्र आता पदापेक्षा परिस्थितीला अधिक महत्त्व देण्याचा प्रयत्न दिसत आहे. यामुळे राजशिष्टाचाराच्या पारंपरिक संकल्पनेकडे नव्याने पाहिले जात आहे.

लोकप्रतिनिधींना अनेकदा कायद्यापेक्षा वरचे स्थान दिले जाते आणि त्यांना विशेष सुविधा मिळतात, अशी भावना सर्वसामान्यांमध्ये आढळते.नव्या निर्णयामुळे ही मानसिकता काही प्रमाणात बदलण्यास मदत होऊ शकते. लोकशाहीत सर्व नागरिक समान आहेत आणि कायद्यापुढे कुणालाही विशेषाधिकार नाहीत, हा संदेश अधिक स्पष्टपणे समाजापर्यंत पोहोचू शकतो. अर्थात, हा बदल प्रत्यक्षात राबविणे सोपे नाही. नियमांमध्ये स्पष्टता, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि लोकप्रतिनिधींसोबत सुसंवाद या गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या ठरणार आहेत. योग्य अंमलबजावणी झाल्यास हा निर्णय प्रशासकीय सुधारणांच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो. मात्र अस्पष्टता राहिल्यास नवे वाद निर्माण होण्याची शक्यता देखील तितकीच आहे.

भारतात राजशिष्टाचाराची परंपरा मोठ्या प्रमाणावर अलिखित स्वरूपात विकसित झाली आहे. अनेक राज्यांत अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या वर्तनासंदर्भात काही प्रमाणात आचारसंहिता असली तरी दोषी किंवा चौकशीचा सामना करणार्या लोकप्रतिनिधींना कसा प्रोटोकॉल द्यावा, याबाबत स्पष्ट नियम फारसे दिसून येत नाहीत. केंद्र सरकारदेखील वेळोवेळी नोकरशाहीसाठी निष्पक्षता आणि राजकीय तटस्थतेवर भर देणारे दिशानिर्देश जारी करते; मात्र उभे राहून स्वागत करणे किंवा न करणे अशा सूक्ष्म स्तरावरील बाबी स्पष्टपणे निश्चित केलेल्या नाहीत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचा निर्णय वेगळा ठरतो. कारण हा केवळ नैतिक सल्ला नसून अधिकृत प्रशासकीय आदेशाच्या स्वरूपात लागू करण्यात आलेला बदल आहे. दोषसिद्धी, चौकशी आणि निवडणूक प्रक्रिया यांसारख्या परिस्थितींचा थेट उल्लेख करून सरकारने राजशिष्टाचाराच्या चौकटीत वास्तववादी बदल करण्याचा प्रयत्न केला आहे. या निर्णयाचा प्रत्यक्ष परिणाम काय होतो, प्रशासकीय निष्पक्षता अधिक मजबूत होते की नव्या वादांना तोंड फुटते, हे आगामी काळात स्पष्ट होईल.


●●●



# काँग्रेसने संधी गमावली



**नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल काँग्रेसच्या संघटनात्मक मर्यादा आणि राजकीय रणनीतीमधील त्रुटी चव्हाट्यावर आणणारे ठरले आहेत. केरळमध्ये डाव्या आघाडीच्या विरोधात दहा वर्षांपासून असलेली सत्ताविरोधी लाट काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला विजयाकडे घेऊन जाईल, असे संकेत आधीच मिळत होते; पण उर्वरित राज्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीला मोठा धक्का दिला आहे. काँग्रेस आपल्या जुन्या चुकांमधून कोणताही धडा घ्यायला तयार नाही आणि नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी लागणारी कल्पकता किंवा धाडस त्यांच्याकडे उरलेले नाही, यावर या निकालांनी पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. हे निकाल केवळ काँग्रेसपुरते मर्यादित नसून, संपूर्ण विरोधी पक्षांच्या इंडिया ब्लॉकसाठी एक मोठा तडाखा आहे. यातून सावरणे त्यांच्यासाठी आगामी काळात कठीण जाणार आहे.**



रशिद किडवई,
ज्येष्ठ राजकीय विश्लेषक,
नवी दिल्ली

**पश्चिम** बंगालमध्ये काँग्रेसची कामगिरी सुधारण्यासाठी बरीचशी संधी होती; पण राहुल गांधी यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर केलेला हल्ला इंडिया आघाडीसाठी आत्मघातकी ठरला. निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यात राहुल गांधींनी ज्या प्रकारे थेट ममता बॅनर्जींवर टीका केली, त्यामुळे भाजपाविरोधी मतांचे मोठ्या प्रमाणावर विभाजन झाले आणि त्याचा थेट फायदा भारतीय जनता पक्षाला मिळाला. जरी ममता बॅनर्जी यांच्या पराभवाचे श्रेय भाजपाच्या सुनियोजित निवडणूक व्यवस्थापनाला दिले जात असले, तरी काँग्रेसच्या रणनीतीने त्या पराभवाचा विस्तार अधिक मोठा केला हे वास्तव आहे. बंगालमधील काँग्रेसच्या भूमिकेमुळे इंडिया आघाडीच्या ऐक्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दोन वर्षांपूर्वी लोकसभेच्या वेळी या आघाडीने जी विश्वासार्हता निर्माण केली होती, ती आता पुन्हा शून्यावर येऊन ठेपली आहे, असे चित्र निर्माण झाले आहे. भाजपच्या हिंदुत्वाच्या अजेंड्याला रोखण्यासाठी कोणतीही प्रभावी रणनीती सध्या कोणत्याही विरोधी पक्षाकडे दिसून येत नाही, ही चिंतेची बाब आहे.

तमिळनाडूमध्ये तर काँग्रेस नेतृत्वाची रणनीती पूर्णपणे फसल्याचे दिसून आले. सत्ताधारी द्रमुकच्या विरोधात वाढत असलेल्या सत्ताविरोधी लाटेचा अंदाज घेण्यात काँग्रेसचे हायकमांड पूर्णपणे अपयशी ठरले. राज्यातील जनमताचा कल पाहता, अभिनेते विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम अर्थात टीव्हीके या नवीन पक्षासोबत युती करण्याची मोठी संधी काँग्रेसकडे होती. विजय यांचे वडील एसए चंद्रशेखर यांनी वर्षाच्या सुरुवातीलाच तसा प्रस्तावही दिला होता. काँग्रेसचे तरुण नेते प्रवीण चक्रवर्ती, जोति मणी आणि मणिकम टागोर हे जुने मतभेद सोडून टीव्हीकेसोबत जाण्यासाठी आग्रही होते. मात्र, पी चिदंबरम यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांच्या सल्ल्याला प्राधान्य देऊन राहुल गांधींनी नवीन मित्र निवडण्याचे धाडस दाखवले नाही. आता निकालानंतर टीव्हीके हा १०८ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आल्यावर काँग्रेसला आपली चूक उमजली असून, त्यांनी सत्तेसाठी द्रमुकची साथ सोडून विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. पण ही उपरती निवडणूकपूर्व झाली असती, तर चित्र वेगळे राहिले असते.


आसामची परिस्थिती तर त्याहून अधिक बिकट आहे. तिथे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या प्रखर हिंदुत्वाचा मुकाबला करणे काँग्रेससाठी आधीच सोपे नव्हते, पण तिथे पक्षाने स्वतःच्या पायावर दगड पाडून घेतला. भाजपाशी लढण्याऐवजी काँग्रेसचे राज्यातील ज्येष्ठ नेते आपापसातच भांडत राहिले. निवडणूक प्रचाराच्या काळात राज्य प्रभारी भंवर जितेंद्र सिंह आणि प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई यांच्यात संवाद पूर्णपणे तुटला होता. या समन्वयाच्या अभावामुळे कार्यकर्त्यांचे मनोबल खचले आणि केंद्रीय नेतृत्वानेही वेळीच लक्ष न दिल्याने तिथे पराभव स्वीकारावा लागला. जणू हायकमांडने आधीच हार मानून तिथे पक्षाला नियतीच्या स्वाधीन सोडून दिले होते की काय, असे वाटत होते.

केरळमध्ये काँग्रेसप्रणीत आघाडीला यश मिळाले असले तरी, हा केवळ सत्ताविरोधी लाटेचा परिणाम नसून तो डाव्या आघाडीने जनतेचा विश्वास गमावल्यामुळे मिळालेला एक नैतिक धडा आहे. मात्र, या एका यशामुळे काँग्रेसला आलेली मरगळ झटकता येईल का, हा मोठा प्रश्न आहे. काँग्रेसची सध्याची अवस्था अशी झाली आहे की, ते ना जुन्या मित्रांना सांभाळू शकत आहेत, ना नवीन मित्रांशी वेळेत तडजोड करू शकत आहेत. देशात सध्या भाजपने निर्माण केलेले वर्चस्व आणि प्रस्थापित केलेले हिंदुत्वाचे नवीन नॅरेटिव्ह यांना आव्हान देण्यासाठी केवळ निवडणुका लढवून चालणार नाही, तर एक ठाम वैचारिक भूमिका आणि मजबूत संघटनात्मक बांधणीची गरज आहे. काँग्रेसकडे सध्या या दोन्ही गोष्टींचा अभाव जाणवत आहे.

आगामी काळात उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पंजाब यांसारख्या महत्त्वाच्या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये भाजपाने आपल्या हिंदुत्वाच्या कार्डचा यशस्वी प्रयोग केला असून, तिथे ते अधिक आक्रमकपणे निवडणुकीला सामोरे जातील. अशा परिस्थितीत, खचलेल्या मनोबलासह काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष भाजपाच्या अवाढव्य निवडणूक यंत्रणेचा मुकाबला कसा करणार, हा यक्षप्रश्न आहे. काँग्रेसला पुनरुज्जीवन हवे असेल, तर त्यांना आपल्या रणनीतीत आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. निव्वळ भाजपाला विरोध करणे ही रणनीती असू शकत नाही, तर जनतेसमोर स्वतःचा एक पर्यायी कार्यक्रम ठेवणे गरजेचे आहे. प्रादेशिक पक्षांशी युती करताना काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट ठेवायला हवी. कधी ममता बॅनर्जींवर टीका करायची तर कधी त्यांच्याशी युतीचे स्वप्न पाहायचे, या गोंधळलेल्या भूमिकेमुळे मतदारांमध्ये नकारात्मक संदेश जातो. तामिळनाडूमध्ये निवडणुका संपल्यावर द्रमुकला सोडून टीव्हीकेला पाठिंबा देण्याने काँग्रेसची प्रतिमा एक विश्वासार्ह मित्र म्हणून मलिन होण्याची शक्यता आहे. थोडक्यात सांगायचे तर, काँग्रेस आणि इंडिया आघाडी सध्या एका अशा वळणावर उभी आहे जिथे एक छोटीशी चूकही त्यांच्या भविष्यासाठी घातक ठरू शकते. निवडणुकांचे निकाल हा जनतेने दिलेला एक संदेश असतो. काँग्रेसला या संदेशाचे आकलनच झाले नाही तर आगामी काळात त्यांची स्थिती अधिक बिकट होईल.

●●●

# नवाकाळ शब्दकोडे-१६०१



**आडवे शब्द -**

१. सशस्त्र शिपाई, सैनिक इ. ५. प्रमुख दिशांची संख्या ६. दार बंद करण्याचे साधन, साखळीतील घटक ८. कैदेची शिक्षा १२. घाबरट १३. ललाट, कपाळ १४. उत्साह १६. हिंदीत राजवाडा, प्रासाद १७. स्वच्छता १८. अननुभवी, अजून शिकत असलेला १९. हार मान्य करणे २१. यथातथा, कमी दर्जाचे २२. हडळ २४. पैशाच्या जोरावर माजलेला २९. पाणी ३१. हत्तीचे पिल्लू ३३. प्रेमात पडलेला, लुब्ध ३४. एक पालेभाजी, हिच्या बियांचे तेलही काढतात ३७. नाराजी ३९. कावळा ४१. बासुंदीचा घट्ट प्रकार ४३. सय, मैत्रीण ४४. जीव तोडून प्रयत्न करणे ४७. तान ४८. आप्त ५०. वात्सल्य ५१. लहान मूल ५३. मलीन, मळलेली ५५. अरण्य ५६. भाजलेले हरभरे ५७. गुणवान ५८. सरिता ५९. हळू ६१. शरीर ६२. वीज, बिजली ६४. उसापासून तयार केला जाणारा एक जिन्नस ६५. बंधू ६६. अननुभवी ६७. खोटेपणा ६८. नोकरीतील सुट्टी ६९. ठोसा ७०. या ठिकाणी ७१. कपर्दिक ७३. जिवलग मित्र ७५. बारीक फोड ७६. गायन, गीत ७७. कुचंबणा झालेला ७८. पोरका ८०. रात्र ८१. पाण्याचा कालवा ८२. गुन्ह्याचा संशय ८४. तिखटपणासाठी वापरली जाणारी शेंग ८६. पाणी पिण्याचे छोटे भांडे ८९. वेदांची संख्या ९०. दोषारोप ९२. सततचे स्मरण ९४. चूक मान्य करणे ९६. मारामारी ९९. निकट १००. किरकोळ, गौण १०१. तमाशाचा पूर्वार्ध १०२. आशीर्वादातील 'तसेच असो'

**उभे शब्द -**

२. 'आधीच उल्हास ×× ××× ××' ३. उठाव ४. डोंगरउताराची जमीन ५. नोकरदार ६. कणव, उमाळा ७. इसापनीतीमधला धूर्त प्राणी ९. नागपूरजवळची एक टेकडी, वनवासात असताना इथे श्रीरामाने विश्रांती घेतली अशी भाविकांची श्रद्धा आहे १०. वाहून नेणारा ११. बोचणे, टोचत राहणे १३. जाणीव, समज १४. उन्हाळ्यातला त्रास १५. औषधाची मात्रा उगाळण्याचा दगड २०. बटबटीत २३. किडा २५. थंडी २६. प्रेम २७. निव्वळ २८. किरकिर, रडगाणे ३०. पूर्वीच्या पिढीतील पुरुषांचे शिरोभूषण ३२. घाबरलेला ३५. पुष्कळ ३६. ईर्षा, चुरस ३७. इस्पितळ ३८. सूर्य ४०. उपमर्द ४२. भेट दिलेले ४४. युद्ध ४५. यादी, सूची ४६. सावली, मुलींचे एक नाव ४८. मेटाकुटीला येणे ४९. अवधान ५१. अभिमानी ५२. बैराग्याचे वस्त्र ५४. रामदासांनी येथे दासबोध लिहिला ५५. अधीन ५६. मुलींचा एक पारंपरिक खेळ ५७. अतिशय मऊ ५९. प्रामाणिक ६०. चार चाकी छोटे वाहन ६१. एक आंबट पालेभाजी ६३. ऐट ६७. त्वरित, लगेच ७१. प्रेत ७२. करंगळीच्या शेजारचे बोट ७४. गांधीजींचे वस्त्र ७५. कीर्तनकार, पुराण सांगणारा, एक आडनाव ७६. बेसावध ७७. शर्त ७९. लेप, स्तर ८१. भांडे ८३. आश्रम ८५. सामानसुमान ८६. चूक दर्शविणारे चिन्ह ८७. पैसे ठेवण्याची चामडी पिशवी, लखोटा ८८. गडू, लहान तांब्या ८९. आयुर्वेदिक औषधाची उगाळलेली मात्रा ९१. विहग ९३. घटिकेचा हिस्सा ९५. भित्रा ९६. आच, उष्णता ९७. पाऊल ९८. समय ९९. समूह, तांडा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०० चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. लगाम ४. मनकवडा ७. मोहिनी १०. साक्षी १२. ढग १३. लाच १४. आफत १५. अवलक्षण १६. कावा १७. गरूड १९. नवागत २१. पावती २२. कचेरी २४. रगड २६. तळे ३०. पातक ३२. लागण ३३. ताबडतोब ३५. पाय ३६. लस ३८. अंगण ३९. ललाट ४०. धरपकड ४३. सगळे ४४. तगडा ४५. हरीण ४६. लहानपण ४८. तागडी ५१. रडू ५२. कवाड ५३. कमतरता ५५. लवण ५९. आगगाडी ६१. पसा ६२. मद्य ६३. तिकडे ६५. जपान ६७. खवा ६८. दिन ६९. अंतर ७०. मराठी ७१. टवटवी ७३. सुपंथ ७४. सवाई ७६. सध्या ७८. धबधबा ८०. रुबाई ८२. गुलाल ८४. फणस ८६. खोपट ८७. अत्यवस्थ ८९. धार ९०. पट ९१. नवरी ९३. पाचू ९४. दक्ष ९५. कथकली ९७. पहिला ९९. अस्थिर १००. टप्पल १०१. मनधरणी १०२. वलय

**उभे शब्द :** १. गाढवाचे पाय धरी ३. मग ४. मगरूर ५. कला ६. वचन ७. मोफत ८. हित ९. नवती १०. साक्षर ११. क्षीण १४. आगळेवेगळे १५. अवघड १६. काक १८. डगला २०. वात २३. रीत २५. डगर २७. पिता २८. तबलजी २९. कर्नाटक ३१. कलप ३४. बरगडी ३७. सकल ३८. अंगण वाकडे ४१. रणरण ४२. डहाळी ४३. सपक ४४. तगमग ४५. हकालपट्टी ४९. जोम ५०. धीर ५३. कडीपाट ५३अ. तट ५४. ताजवा ५६. वसा ५७. वैद्य ५८. पतित ५९. आमराई ६०. गाज ६२. मनसुबा ६४. कर ६६. नवरा ६७. खवीस ६९. अंथरूण ७०. मवाली ७२. आब ७५. फलाट ७७. ध्यानस्थ ७८. धडधाकट ७९. धट ८१. बासन ८२. गुपचूप ८३. व्रात्य ८४. फटकळ ८५. सुरी ८६. खोपा ८७. अक्ष ८८. वस्तुस्थिती ९०. पथ ९२. वदन ९४. दलाल ९५. कल ९६. क्षीर ९८. हिव




# राशिभविष्य

**रविवार १०/०५/२०२६ ते शनिवार १६/०५/२०२६**

## मेष

**तुमचा** राशीस्वामी मंगळ लवकरच तुमच्या राशीमध्ये भ्रमण करणार आहे.याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. एकंदरीत हा आठवडा चांगला जाणार आहे. बंधने, पथ्य, नियम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. मनावरील ताण कमी करा. आत्मविश्वासाने निर्णय घेऊन संयमाने त्याची अंमलबजावणी करावी. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. अचानक व अनपेक्षित आर्थिक उलाढाली होऊ शकतात. खर्चावर नियंत्रण ठेवा. आठवड्याच्या मध्यानंतर तुमची स्थिती जास्त मजबूत होईल. मात्र अहंकारही वाढू शकतो. बोलताना योग्य शब्द वापरण्याची काळजी घ्यावी.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. विनाकारण मतभेद टाळण्यासाठी पुढाकार घ्यावा. जोडीदाराशी सामोपचाराचे धोरण ठेवावे. संततीबरोबर वेळ घालवाल. भावंडांशी वागताना अहंकार बाजूला ठेवा.

उद्योगव्यवसायात नवीन कल्पना अमलात आणण्यासाठी पुढाकार घ्या. मात्र विरोधकांचे प्राबल्य वाढणार आहे त्याप्रमाणे तुमचे धोरण ठरवा. तुमच्यातील नेतृत्वगुणाचा कस लागेल. भागीदारीतील व्यवसायात गैरसमज, तात्त्विक मतभेद होऊ शकतात. आर्थिक नियोजन करताना तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. अतिधाडस टाळावे.

**शुभ दिनांक :** १०, ११.

## वृषभ

**आठवड्याचा** मध्य महत्त्वाच्या कामांसाठी चांगला राहील. आठवड्याच्या सुरुवातीलाच प्रवास होऊ शकतो. आत्मविश्वास चांगला ठेवा. जबाबदाऱ्या पार पाडताना व्यावहारिक बाजू विसरू नका. मनामध्ये येणारे बंडखोर विचार नियंत्रणात ठेवावे. कितीही अडथळे आले तरीही तुमचे कार्य पूर्ण होणार आहे. आर्थिक लाभ चांगले होतील. आर्थिक गुंतवणूक करताना मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याने व सावधपणे करावी. मनामध्ये विचारांची गर्दी होईल. कुठलाही निर्णय घाईगडबडीत घेऊ नका.

कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना तारांबळ उडेल. अधिक खर्चाची तयारी ठेवा. भावंडांची साथ मिळेल परंतु थोडे मतभेद होऊ शकतात. भावनेच्या भरात चुकीचे निर्णय घेऊ नका. घरातील ज्येष्ठांची काळजी वाटेल.

उद्योगव्यवसायात तुमच्या कार्यपद्धतीचा लोकांना अंदाज येऊ देऊ नका. कामाचे श्रेय मिळण्यासाठी सध्या थांबावे लागेल. आर्थिक धोरण आखताना अनुभवी व्यक्तीचा सल्ला जरूर घ्या. भागीदाराचे वर्चस्व जाणवेल. नवीन संधीचा लाभ घेताना तुमच्या संवादकौशल्याचा उपयोग होईल. नोकरदारांनी संयमी धोरण ठेवावे. वरिष्ठांची साथ गृहीत धरू नका.

**शुभ दिनांक :** १०, ११, १४.

## मिथुन

**आठवड्याचा** उत्तरार्ध महत्त्वाच्या कामासाठी चांगला राहील. सुरुवातीला काही अडथळे जाणवतील. तुमचा राशीस्वामी बुध लाभस्थानातून भ्रमण करत आहे. ही सकारात्मक बाब आहे. लाभाचे प्रमाण वाढेल. कुठलाही निर्णय घाईगडबडीत किंवा अति धाडसाने घेऊ नका. आर्थिक गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगावी. बोलण्यावर नियंत्रण हवे. कामाची गती थोडी कमी असली तरीही ठरवलेले कार्य पूर्ण होईल.

कौटुंबिक वातावरण चांगले राहील. सहलीचे बेत आखले जातील. जोडीदाराशी मतभेद झाले तरी टोकाची भूमिका घेऊ नका. घरातील छोट्या मोठ्या समस्या सामंजस्याने सोडवता येतील. भावंडांचे सौख्य राहील. संततीसाठी जास्तीच्या खर्चाचे नियोजन करावे.

कार्यक्षेत्रामध्ये चढ उतार जाणवेल. अनपेक्षित घटना घडतील. आधी केलेल्या प्रयत्नांचे फळ आठवड्याच्या उत्तरार्धात मिळणार आहे. नोकरदारांच्या कष्टाचे चीज होईल. नवीन संधी, कल्पना प्रत्यक्षात उतरवता येतील. व्यावसायिकांनी नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी तपासून घ्याव्यात. प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवावे लागेल. नियमांचे पालन कसोशीने करा. झटपट लाभाच्या मोहात अडकू नये. भांडवल उभे करता येईल.

**शुभ दिनांक :** १३, १४.

## कर्क

**आठवड्याच्या** सुरुवातीला हाती घेतलेले काम आठवड्याच्या शेवटी पूर्ण होईल. मात्र वाढलेले कष्ट व अडथळे यांना तोंड द्यावे लागेल. लाभाचे प्रमाण चांगले राहील. मात्र खर्चावर नियंत्रण हवे. कुठलाही नवीन व्यवहार करताना आधी पूर्ण अभ्यास करावा. आर्थिक गुंतवणुकीचा फायदा होईल. अनावश्यक खर्च टाळावेत.विरोधकांवर मात करता येईल.

कौटुंबिक वातावरण सर्वसाधारण राहील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. जोडीदाराच्या मताचा आदर करावा. संततीची प्रगती समाधानकारक राहील. मित्रांबरोबर आनंदात वेळ घालवाल. कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल.

उद्योग व्यवसायात तुमच्या योजना यशस्वी ठरल्यामुळे मानसन्मान मिळेल. कार्यप्रणालीत केलेले बदल योग्य ठरतील. अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागल्यामुळे तारांबळ उडेल. विश्वासू व्यक्तीची मदत घ्यावी. काही समस्या चतुराईने सोडवाव्यात. आर्थिक गणिते जुळून येतील. नोकरदारांनी नियमाप्रमाणे काम करावे. वरिष्ठांची साथ, सल्ला महत्त्वाचा ठरेल.

आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक :** १०, ११.

## सिंह

**महत्त्वाची** कामे आठवड्याच्या सुरुवातीलाच करून घ्या. कुठल्याही कामाची सुरुवात उत्तम नियोजनानेच करा. आर्थिक लाभ चांगले होतील. आर्थिक गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगा. मोठी गुंतवणूक पुढे ढकला. नियमांविरुद्ध कुठलीही गोष्ट करू नये. मनाचा उत्साह टिकवून ठेवावा लागेल. लोकसंग्रह वाढेल.

कौटुंबिक वातावरण हळूहळू सुधारेल. मात्र वेळप्रसंगी काही कटू निर्णय घ्यावे लागतील. तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. जोडीदाराच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. भावंडांचे सुख लाभेल. अहंकार बाजूला ठेवा. कौटुंबिक आर्थिक नियोजन करताना ज्येष्ठांचा सल्ला जरूर घ्या.

नोकरीव्यवसायात स्पर्धात्मक वातावरण जाणवणार आहे. हितशत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवा. तुमचा सामाजिक दर्जा वाढेल. भविष्यातील फायदा विचारात घेऊन काही मनाविरुद्ध गोष्टी कराव्या लागतील. नवीन व्यवहार व्यवसायाच्या दृष्टीने उपयोगी ठरतील. नोकरदारांनी वरिष्ठांचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी कामामध्ये सातत्य ठेवावे. भागीदारांमध्ये गैरसमज होऊ शकतो. माणसांची पारख योग्य तऱ्हेने करा.

**शुभ दिनांक :** १०, ११.

## कन्या

**सुरुवातीला** आळशीपणावर नियंत्रण मिळवावे लागेल. स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी योग्य नियोजन व आवश्यकतेनुसार पर्यायी व्यवस्था याचा विचार करून ठेवा. आठवड्याचा मध्य महत्त्वाच्या कामासाठी योग्य ठरणार आहे. आत्मविश्वास चांगला ठेवा. स्वकर्तृत्वावर पुढे जायचे आहे. आर्थिक गुंतवणूक थोड्याफार प्रमाणात यश देईल. संचित धन वाढवू शकाल. द्विधा मानसिकता निर्णय घेताना त्रासदायक ठरेल. आवश्यकतेनुसार अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या. प्रत्यक्ष कृतीला उशीर करू नका.

कौटुंबिक वातावरण चांगले राहील. सहलीबरोबरच धार्मिक पर्यटनही होऊ शकते. आईचा सल्ला मोलाचा ठरेल. भावंडे, मित्रपरिवार यांच्याशी मतभेदामुळे दुरावा निर्माण होऊ शकतो. काळजी घ्या. जोडीदाराचे कर्तृत्व समाधान देईल. मुलांचे हट्ट पुरवावे लागतील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये.

व्यावसायिकांनी विरोधकांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे. डावपेच ओळखून त्याप्रमाणे तुमचे निर्णय घ्या. नोकरदारांनी थोडी सावध भूमिका घ्यावी. वरिष्ठांचा रोष ओढवून घेतला जाऊ शकतो. व्यावसायिकांनी पैसा अडकून पडणार नाही याकडे आवर्जून लक्ष द्यावे. आरोग्याची काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** ११, १३.

## तूळ

**आठवड्याच्या** सुरुवातीला सकारात्मक दृष्टीकोन ठेवा. उत्तरार्ध तुमच्यासाठी चांगला आहे. आर्थिक आवक जावक सम प्रमाणात राहील. त्यामुळे वैयक्तिक तसेच व्यावसायिक कारणांसाठी आर्थिक नियोजन करणे योग्य राहील. राशीस्वामी शुक्र स्वगृहीचा आहे त्यामुळे अडचणी असल्या तरीही त्यातून बाहेर पडण्याची क्षमताही नक्की आहे. तुमच्यामधील आक्रमकता वाढू शकते.

कौटुंबिक दृष्टीने विचार करता संमिश्र वातावरण घरामध्ये राहील. अनावश्यक गृहखर्चावर नियंत्रण ठेवा. जोडीदाराचा सल्ला, व्यावहारिक दृष्टिकोन महत्त्वाचा व उपयोगी ठरेल. धार्मिक पर्यटन होऊ शकेल. घरातील व्यक्तींच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. भावंडांशी मतभेद झाले तरी टोकाला जाणार नाही. तुम्हाला पुढाकार घेऊन सगळ्यांमध्ये समन्वय ठेवावा लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन संधी, नवीन ओळखी यामुळे तुमचा कार्यविस्तार होऊ शकतो. तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला व तुमचा अनुभव याप्रमाणे तुमचे धोरण ठरवा. कायदेशीर बाबी दुर्लक्षित करू नका. नोकरदारांना संयम ठेवावा लागेल. प्रतिष्ठा जपावी. नेतृत्वकौशल्याचा उपयोग फायदेशीर ठरेल. प्रवासात थोड्या अडचणी येऊ शकतात.

**शुभ दिनांक :** १३, १४.

## वृश्चिक

**हा आठवडा** संमिश्र स्वरूपाचा आहे. मनाची चंचलता राहील. कोणताही निर्णय घेताना थोडी गडबड होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या शेवटी कामात उत्साह वाढेल. तुमच्या कामाला गती येईल. प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यात यशस्वी व्हाल.

घरातील वातावरण आनंदी व शांत ठेवण्याचा प्रयत्न कराल. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीकडून चांगली बातमी मिळू शकते. जुन्या गैरसमजांवर चर्चा करून नातेसंबंध सुधारण्याची संधी मिळेल. ज्येष्ठांचा सल्ला उपयोगी पडेल. विवाहितांसाठी जोडीदाराचा चांगला पाठिंबा मिळेल. प्रेमात असणाऱ्यांना थोडा भावनिक ताण जाणवू शकतो.

कार्यक्षेत्रात तुमच्या मेहनतीची प्रशंसा होईल. एखादे महत्त्वाचे काम पूर्ण करण्याची संधी मिळेल. नोकरीमध्ये प्रवास घडू शकतो. व्यवसायामध्ये अचानक काही अडचणी येऊ शकतात. भागीदारीमध्ये सावध राहणे फायदेशीर ठरेल. नवीन ओळखी वाढतील. आर्थिक स्थिती स्थिर राहील. उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळू शकते.

झोपेच्या व पचनाच्या तक्रारी वाढतील.

**शुभ दिनांक :** ११, १३.

## धनु

**हा आठवडा** संमिश्र स्वरूपाचा राहील. योग्य निर्णय घेणे हितावह ठरेल. मानसिक ताण जाणवेल परंतु थोडे संयमाने कामे केली तर फायदा होईल. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी वरिष्ठांचा सल्ला घेणे योग्य राहील. स्वतःचे मत फार पररखडपणे व्यक्त करू नये. नैराश्य टाळा.

वास्तुसंबंधित कामांमध्ये विलंब होण्याची शक्यता राहील. नवीन गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. कुटुंबात मतभेद वाढतील. सतर्क राहावे. जोडीदाराची साथ मिळेल. संततीबाबत चांगली बातमी कळेल. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्या.

वडिलोपार्जित व्यवसाय फायदेशीर ठरतील. नोकरीत कामाचा ताण वाढेल. नोकरीच्या शोधात असलेल्यांना यश मिळेल. आर्थिक स्थिती साधारण राहील. अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता आहे. प्रवास फायदेशीर ठरतील. कुठल्याही व्यवहारात गाफील राहू नका. स्पर्धात्मक वातावरण राहील. चतुराईने परिस्थिती हाताळली तर यश मिळेल.

**शुभ दिनांक :** ११.

## मकर

**आठवड्याची** सुरुवात उत्साही होईल. नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी प्रयत्नशील राहाल. तुमच्या आवडत्या कलाछंदात रमाल. आर्थिक बाबतीत स्थिरता राहील. अचानक खर्च होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चिंता वाढू शकतात. गुंतवणूक करताना विचार करणे गरजेचे राहील. बोलताना काळजीपूर्वक बोला.

कौटुंबिक वातावरण खेळीमेळीचे राहील. कुटुंबियांबरोबर छोट्या सहलीचा आनंद घ्याल. संततीच्या शुभवार्ता समजतील. विवाहोत्सुक मंडळींना विवाहाचे प्रस्ताव येतील. वडिलधाऱ्यांच्या मताचा मान ठेवावा लागेल. त्यांच्या आरोग्याच्या किरकोळ तक्रारी राहतील.

कार्यक्षेत्रात कामाचा ताण जाणवू शकतो. गृहउद्योग व्यावसायिकांना मेहनत आणि शिस्त पुढे नेईल. नोकरीमध्ये नवीन जबाबदारी घ्यावी लागू शकते. काहीवेळेला प्रवास घडण्याची शक्यता राहील. वरिष्ठांची मर्जी संपादन करा. नवीन आधुनिक तंत्रज्ञान शिकल्याने फायदा होईल.

**शुभ दिनांक :** ११,१३.

## कुंभ

**आठवड्याच्या** सुरुवातीला काही अनामिक हुरहूर वाटत असली तरी परिश्रम आणि मेहनतीने यश मिळवू शकाल. परिस्थितीवर मात करण्यासाठी संयम आणि भरवसा ठेवणे फायदेशीर ठरेल. स्वतःला थोडा वेळ दिला पाहिजे. सकारात्मक विचार ठेवा. नवीन संधी मिळेल, तिचा फायदा होईल.

कुटुंबामध्ये आनंदी वातावरण राहील. एखाद्या समारंभात सहभागी होण्याचा योग. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीने समाधान लाभेल. वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद लाभतील. सामाजिक कार्यात रस निर्माण होईल. तरुणांना प्रेमात अनुकूल प्रतिसाद मिळेल. भावंडांचे सहकार्य चांगले राहील.

कार्यक्षेत्रात आर्थिक चढउतार राहतील. अनावश्यक खर्च कमी करावेत. व्यवसायवृद्धीसाठी नवीन गोष्टी शिकण्याकडे कल राहील. भागीदार आणि सहकारी वर्गाला सांभाळून घ्यावे लागेल. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. नोकरीत असणाऱ्यांच्या कामाची दखल घेतली जाईल. मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी ध्यानधारणा करणे फायदेशीर ठरेल.

**शुभ दिनांक :** १०, ११, १३.

## मीन

**आठवड्याच्या** सुरुवातीला मनासारख्या काही घटना घडल्या नाहीत तरी नंतर सर्व गोष्टी मार्गी लागतील. आत्मविश्वासाने कार्यरत रहा. तुमच्या जिद्दीला यश मिळणार आहे. वेळेचा सदुपयोग करा. आर्थिक स्थिती चांगली राहील. मात्र व्यवहार विचारपूर्वक करावेत, मानसिक स्थैर्य महत्त्वाचे आहे.

घरामध्ये एखाद्या धार्मिक कार्याचे आयोजन कराल. कुटुंबातील सदस्यांबरोबर वेळ घालवण्याची संधी मिळेल. नातेसंबंध अधिक दृढ होतील. मात्र तुमच्या बोलण्याने काही गैरसमज होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. भावना व व्यवहार यामध्ये समन्वय राहावा म्हणून प्रयत्नशील राहावे.

कार्यक्षेत्रात अडलेली कामे मार्गी लागतील. एखादा छोटा फायदा मिळू शकतो. बचत वाढवण्याचा प्रयत्न करा. नोकरीमध्ये नवीन संधी मिळू शकेल. व्यवसायामध्ये नवीन करार करण्याचे मनात येईल. स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांसाठी अनुकूल काळ राहील. वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधित कामांमध्ये सफलता मिळेल.

आरोग्याचा समस्या दूर होतील, मात्र त्यासाठी जास्त विचार करणे टाळायला हवे.

**शुभ दिनांक :** १०, १३, १४.

- ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

# १९७१ च्या एसआरए कायद्याचे 'ऑडिट' करा, तज्ज्ञ समिती नेमा

हायकोर्टाचे आदेश



■ मुंबई

**महाराष्ट्र** झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) कायदा, १९७१ ची प्रभावी अंमलबजावणी आणि त्यातील त्रुटी तपासण्यासाठी पुढील चार आठवड्यांत कायद्याचे ऑडिट करा, यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात यावी, असे महत्त्वपूर्ण आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारला दिले. मुंबईसह प्रमुख शहरे झोपडपट्टीमुक्त करण्याच्या हेतूने न्यायालयाने सरकारला हे आदेश दिले.

झोपडपट्टी पुनर्वसनासंबंधी गंभीर प्रश्नावर सविस्तर सुनावणी घेण्यासाठी उच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करुन घेतली होती. त्यावर न्यायमूर्ती गिरिश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने शुक्रवारी महत्त्वपूर्ण निकाल दिला. मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरात आजही मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या असणे हे नगररचनेच्या तत्त्वांचे अपयश आहे, असे निरीक्षण नोंदवत खंडपीठाने राज्य सरकारच्या अपयशावर ताशेरे ओढले.

१९७१ चा कायदा अस्तित्वात येऊन ५ दशके उलटली तरी मुंबई झोपडपट्टीमुक्त का झाली नाही? या कायद्याने नक्की काय साध्य केले आणि कुठे कमतरता राहिली, याचे सखोल ऑडिट तज्ज्ञांच्या समितीमार्फत करण्यात यावे, असे आदेश न्यायालयाने दिले. सध्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सध्याची यंत्रणा कामाच्या ओझ्याखाली दबलेली आहे.

# डॉ. स्तुती सोनावणे आत्महत्या प्रकरण
## नायर रुग्णालयातील डॉ. बंगाना दिलासा

■ मुंबई

**नायर** हॉस्पिटल डेंटल कॉलेजमधील डॉ. स्तुती सोनावणे या पदव्युत्तर दंतवैद्यकीय विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणात डॉ. कुलविंदर सिंग बंगा यांना सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणी नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेज येथील वरिष्ठ डॉक्टर असलेल्या डॉ. बंगा यांची चौकशी सुरू आहे.

२४ वर्षीय डॉ. स्तुती सोनावणे पदव्युत्तर दंतवैद्यकीय विद्यार्थिनी होती. ती अनुसूचित जातीतील होती. ९ मार्च रोजी आपल्या अँटॉप हिल येथील घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह सापडला होता. पोलिसांना घटनास्थळी एक सुसाइड नोट मिळाली होती. त्यामध्ये वैयक्तिक अडचणींचा उल्लेख असून एका पुरुष मित्राचे नाव नमूद करण्यात आले होते. डॉ. सोनावणेच्या मोबाईल फोनचे विश्लेषण आणि अनेक व्हॉट्सअॅप संदेश तपासल्यानंतर नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेजमध्ये वरिष्ठ प्राध्यापक असलेल्या डॉ. बंगा यांच्यावर त्यांनी जातीवरून त्या छळ केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. बंगा यांचे वकील सुदीप पासबोला आणि अमित घाग यांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, पीडितेला जातीय आधारावर छळ करण्यात आल्याचा कोणताही ठोस पुरावा तपासात आढळलेला नाही. या कारणाने तिने आत्महत्या केली असे सिद्ध होत नाही.

# ले.जनरल एन.एस.राजा सुब्रमणी देशाचे नवे संरक्षण दल प्रमुख

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारने लेफ्टनंट जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांची देशाचे पुढील संरक्षण दल प्रमुख (सीडीएस) म्हणून नियुक्ती केली. विद्यमान सीडीएस जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपुष्टात येणार आहे. त्यानंतर ३१ मे पासून सुब्रमणी हे पदभार स्वीकारणार आहेत. देशाचे तिसरे सीडीएस म्हणून ते तीनही सैन्यदलांमधील समन्वय वाढवणे, संयुक्त लष्करी धोरणे तयार करणे आणि संरक्षण व्यवस्थेचे आधुनिकीकरण यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळतील.



एन.एस.राजा सुब्रमणी सध्या राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात (एनएससीएस) लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. भारतीय लष्करातील त्यांच्या ३५ वर्षांहून अधिक काळाच्या सेवेत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ, सेंट्रल कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ तसेच विविध ऑपरेशनल आणि धोरणात्मक जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

डिसेंबर १९८५ मध्ये गढवाल रायफल्समधून एन.एस. राजा सुब्रमणी भारतीय सैन्यात दाखल झाले. त्यांनी एनडीएमधून प्रशिक्षण घेतले असून ब्रिटनमधील जॉइंट सर्व्हिसेस कमांड अँड स्टाफ कॉलेजमध्ये उच्च शिक्षण पूर्ण केले. माउंटन ब्रिगेडमध्ये ब्रिगेड मेजर म्हणून त्यांनी काम केले. तसेच नॅशनल डिफेन्स कॉलेज, किंग्स कॉलेज लंडन आणि मद्रास विद्यापीठातून त्यांनी उच्च शिक्षण घेतले आहे.

# दहावी निकालानंतर अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

२६ मे रोजी पहिली गुणवत्ता यादी

■ मुंबई

**इयत्ता** दहावीचा निकाल जाहीर होताच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाच्या अर्जाचा दुसरा भाग ११ मेपासून विद्यार्थ्यांना भरता येणार आहे. तर प्रवेशाची तात्पुरती गुणवत्ता यादी १५ मे रोजी, तर पहिली गुणवत्तायादी २६ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

गेल्या वर्षापासून अकरावी प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास अडचण येऊ नये यासाठी शिक्षण संचालनालयाने १० एप्रिलपासून अर्जाचा भाग १ भरण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार ८ मेपर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग भरून नोंदणी केली आहे. दहावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी आणि मुलींसाठी विशेष पाचवी फेरी राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेच्या जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ८ ते १० मे या कालावधीत विद्यार्थी नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाईन सादर करता येईल. ११ ते २० मेदरम्यान शून्य फेरी राबविण्यात येणार आहे.

# सोलापुरात कांद्याला ५० पैसे भाव शेतकऱ्याच्या हाती ४०० रुपये

■ सोलापूर

**सोलापूर** कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या दराने तळ गाठला असून शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. करमाळा तालुक्यातील पांगरे येथील शेतकरी अंकुश अण्णा गुंजाळ यांनी ७३ गोण्या कांदा विकल्यानंतर सर्व खर्च वजा जाता त्यांच्या हाती केवळ ४०० रुपये उरले आहेत. कांद्याला प्रति किलो अवघे ५० पैसे इतका दर मिळाल्याने बळीराजा अक्षरशः रडकुंडीला आला आहे.

गुंजाळ यांनी २१ एप्रिल २०२६ रोजी सोलापूरमधील एका आडत दुकानावर ७३



पोती कांदा विक्रीसाठी आणला होता. मात्र बाजारात कांद्याची आवक वाढल्याने आणि मागणी घटल्याने दर कोसळले. या विक्रीतून त्यांना एकूण ५,०६८ रुपये मिळाले. परंतु गाडी भाडे, हमाली, तोलाई आणि इतर आडत खर्च वजा केल्यानंतर त्यांच्या हातात केवळ ४०० रुपयेच उरले. म्हणजेच प्रत्यक्षात कांद्याला कवडीमोल भाव मिळाल्याची स्थिती निर्माण झाली आहे. एकीकडे उत्पादन खर्च वाढत असताना दुसरीकडे बाजारभाव कोसळत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

# मिठागराची जागा खासगी कंपनीला
## सरकारच्या निष्क्रियतेवर विरोधकांची टीका

■ भाईंदर

**मिरा** रोड येथील मिठागराची २५४ एकर जागा खासगी कंपनीला देण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे तीव्र पडसाद उमटले आहे. काँग्रेस आणि शिवसेनेने यावर राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. खासगी विकासकाला फायदा व्हावा यासाठी सरकारची जागा आपल्या ताब्यात घेण्यात हेतुपूरस्सर दिरंगाई करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. दरम्यान, राज्य शासनाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे.

मिरा रोड पश्चिमेतील ही जागा मूळ राज्य शासनाच्या मालकीची होती. १९५८ मध्ये या जमिनीचा वापर मिठागरासाठी होत असल्याने ती मीठ आयुक्तांच्या नावे होती. ही जागा जमीन धारणाधिकार वर्ग-२ मध्ये केवळ वापरासाठी देण्यात आली होती. नंतर या जागेवर मिरा रियल इस्टेट डेव्हलपर्स, मिरा सॉल्ट वर्क्स, इस्टेट इन्व्हेस्टमेंट आदी कंपन्यांनी दावा केला होता. तेव्हापासून या जागेवर वाद होता. २०२२ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी मिरा सॉल्ट वर्क्स या कंपनीचा दावा फेटाळून लावत ही जागा महाराष्ट्र शासनाकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाला कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान » पान २ वर

# रायगड-पालघरमध्ये जहाजबांधणी नॉर्वेची २,५०० कोटींची गुंतवणूक

■ मुंबई

**मुंबई** महानगर प्रदेशातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राज्य सरकार आता जलवाहतुकीचा पर्याय निर्माण करण्यावर भर देणार आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, वसई-विरार, नवी मुंबई, पनवेल आणि अलिबागपर्यंत जलवाहतूक सुरू करण्याच्या दृष्टीने 'मुंबई वॉटर मेट्रो' प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नॉर्वेच्या हायके एएस या कंपनीसोबत सामंजस्य करार झाला आहे. या प्रकल्पासाठी रायगड, पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जागेचा शोध सुरू



असून यासाठी सुमारे २ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा करार झाला. राज्य सरकारच्या नियोजनानुसार मुंबई महानगर प्रदेशात तब्बल २१ जलमार्ग विकसित केले जाणार आहेत. या प्रकल्पांतर्गत २४ टर्मिनल उभारली जाणार आहेत. मुंबई आणि उपनगरांमधील प्रवासासाठी जलवाहतूक हा पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी, रेल्वे आणि रस्त्यांवरील ताण कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

# धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या नियमनावर ११ मे रोजी सुनावणी

■ नवी दिल्ली

**१४ वर्षांखालील** मुलांना धर्मनिरपेक्ष किंवा धार्मिक शिक्षण देणाऱ्या सर्व संस्थांचे नियमन आणि देखरेख करण्याच्या मागणीसाठी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालय ११ मे रोजी सुनावणी घेणार आहे. या याचिकेत देशभरातील अशा संस्थांची अनिवार्य नोंदणी, मान्यता आणि नियमित पर्यवेक्षण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांना निर्देश देण्याची मागणी केली आहे.

वकील अश्विनी उपाध्याय यांनी ही जनहित याचिका दाखल केली असून, त्यामध्ये मुलांचे शिक्षण, सुरक्षा आणि कल्याण यांच्याशी संबंधित घटनात्मक तरतुदींचा समावेश आहे. याचिकेनुसार अनेक संस्था कोणत्याही अधिकृत मान्यतेशिवाय किंवा देखरेखीशिवाय कार्यरत आहेत. सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये अशा अमान्यताप्राप्त संस्थांची संख्या वाढत आहे. लहान मुलांना शिक्षण देणाऱ्या सर्व संस्थांसाठी समान नियमावली असणे आवश्यक आहे.

# कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या कारभाराबाबत मुस्लीम अहवाल देणार

■ बंगळुरू

**कर्नाटकमधील** विविध मुस्लीम संघटनांनी १६ मे रोजी कर्नाटक मुस्लीम अधिवेशन आयोजित केले असून, त्यामध्ये काँग्रेस सरकारच्या तीन वर्षांच्या कारभारावर आधारित अहवाल प्रसिद्ध करण्यात येणार आहे. 'काँग्रेस सरकारने काय वचन दिले? काय केले? पुढे काय?' या शीर्षकाचा हा अहवाल असेल.

या अधिवेशनाला कोणत्याही राजकीय नेत्याला निमंत्रण देण्यात येणार नसल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर तो मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, मंत्री आणि आमदारांना सादर करण्यात येणार आहे. प्रमुख मुस्लीम संघटना, उलेमा संघटना, महासंघ आणि कर्नाटक राज्य मुस्लीम ओक्कुटाच्या (केआरएमओ) तात्पुरत्या समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीत काँग्रेस सरकारने मुस्लीम समाजाला दिलेल्या वागणुकीबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.

या बैठकीत राज्यभरातील समाज नेते, उलेमा, जमात नेते, वकील, निवृत्त अधिकारी, पत्रकार, कार्यकर्ते आणि केआरएमओचे सदस्य अशा ७५ हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. अहवालात काँग्रेस सरकारच्या तीन वर्षांच्या कामाचा आढावा, मुस्लीम समाजाला दिलेली आश्वासने, त्यांची पूर्तता, प्रतिनिधित्वातील कथित भेदभाव आणि समाजाच्या सध्याच्या मागण्या यांचा समावेश आहे.

# जिल्हाधिकारी अविनाश पाठकांनी कोठडीत अन्न-पाणी नाकारले

■ बीड

**राष्ट्रीय** महामार्ग भूसंपादन आणि मोबदला वाटप प्रकरणात अटकेत असलेले बीडचे माजी जिल्हाधिकारी व आयएएस अधिकारी अविनाश पाठक यांच्या अटकेनंतर जिल्ह्यातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गुरुवारी अटक झाल्यानंतर पाठक यांनी आक्रमक भूमिका घेत कोठडीत अन्न-पाणी घेण्यास सुरुवातीला नकार दिला.

लातूर ते बीड दरम्यानच्या प्रवासात पोलिसांनी वारंवार पाणी देण्याचा प्रयत्न केला असता, मी कोठडीत मेलो तरी चालेल, पण पाणी घेणार नाही, असे सांगत त्यांनी नकार दिल्याची माहिती आहे. या प्रकरणात पोलिसांनी पुराव्यांची भक्कम साखळी उभी केली आहे. बीड जिल्ह्यातील महसूल विभागातील या घोटाळ्यात राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन आणि मोबदला वाटपात तब्बल ७२ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप आहे. तपासात बनावट स्वाक्षऱ्या करून जुन्या तारखांचे आदेश काढल्याचेही उघड झाले आहे. सुमारे २४१ कोटी रुपयांचा मोबदला मंजूर करण्यात आला होता, त्यापैकी ७२ कोटींचा अपहार झाल्याचा संशय आहे. पोलिसांनी मोबाईल कॉल रेकॉर्डिंग, हस्ताक्षर तज्ज्ञांचे अहवाल आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे कारवाई केली आहे.

# नाशिकमध्ये रिंगरोड होणारच विरोधी याचिका कोर्टाने फेटाळली

भूसंपादनाला गती येणार

■ नाशिक

**२०२७ च्या** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहराभोवती प्रस्तावित असलेल्या ६६.१५ किमी बाह्य रिंगरोड प्रकल्पाच्या भूसंपादन विरोधातील याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला असून रिंगरोडच्या कामातील कायदेशीर अडथळे दूर झाले आहेत.

न्यायालयाने याप्रकरणात पढील सुनावणी १ जुलै रोजी ठेवली आहे. तोपर्यंत प्रशासनाला भूसंपादन प्रक्रिया सुरु ठेवता येणार असल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. भूसंपादन प्रक्रियेस अंतरिम स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिल्याने रिंगरोडचा मार्ग प्रशस्त झाला आहे. गोवर्धन, सारूळ, जलालपर व राजूर बहला येथे संपादनापूर्वीची सर्व प्रक्रिया पार पाडावी. असेही निर्देश न्यायालयाने राज्य सरकार तसेच जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळाव्याच्या अनुषंगाने नाशिक शहराभोवती ६६.६५ किलोमीटरचा रिंगरोड उभारण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी २५ गावांमधील ३६७ हेक्टरचे क्षेत्र संपादित करण्यात येत आहे. परंतु, शासनाचे दर तसेच सक्तीच्या भूसंपादनामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. याच नाराजीतून गोवर्धन, सारूळ, जलालपूर व राजूर बहुला या गावांतील बाधित शेतकऱ्यांनी भूसंपादन प्रक्रियेला विरोध करत न्यायालयात धाव घेत दाद मागितली होती. यावर न्यायालयाने ही विरोधी याचिका

# 'पालखी निघाली राजाची' गाण्याचे संगीतकार नितीन मोरजकरांचे निधन

■ मुंबई



**गणेशभक्तांच्या** ओठांवर कायम राहिलेल्या पालखी निघाली राजाची, या अजरामर गीताचे संगीतकार नितीन मोरजकर यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने संगीतविश्वात आणि गणेशभक्तांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

नितीन मोरजकर यांनी आपल्या सुरांच्या जादूने पालखी निघाली राजाची हे गीत अमर केले. हे गाणे केवळ भक्तिगीत नसून गणेशोत्सव आणि लालबागचा राजा यांच्या आगमन-विसर्जनाशी घट्ट जोडलेली भावना आहे. दरवर्षी गणेशोत्सवात हे गाणे वाजताच वातावरण भक्तिमय आणि भारावून जाते. विशेष म्हणजे, लालबागच्या राजाच्या मिरवणुकीत कोळी बांधवांचा बँड, या गीताद्वारे मानवंदना देण्याची परंपरा आजही कायम आहे. त्यामुळे या गाण्याला भक्तांच्या मनात वेगळे स्थान मिळाले आहे. २००५ साली प्रदर्शित झालेल्या या गीताने कॅसेटच्या काळात प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. त्या काळात प्रत्येक गणेश मंडळ, घर आणि मिरवणुकीत हे गाणे ऐकू येत असे.

# भारतातील वाघांमध्ये तणाव

पर्यटन आणि मानवी हालचालींमुळे भारतातील वाघांमध्ये तणाव वाढत असून वाघिणींना सुरक्षित प्रजननासाठी आवश्यक असलेली जागा कमी होत आहे, असे निरिक्षण वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदअंतर्गत कार्यरत असलेल्या सेल्युलर अँड मॉलेक्युलर बायोलॉजी केंद्राने केलेल्या महत्त्वपूर्ण अभ्यासात नोंदवण्यात आले आहे.

अभ्यास अहवालातून निरीक्षण

■ हैदराबाद

**लंडनच्या** प्राणिशास्त्र संस्थेच्या निमल कन्झर्वेश या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या या अभ्यासात २०२० ते २०२३ या कालावधीत पाच प्रमुख व्याघ्र प्रकल्पांमधील वाघांचा अभ्यास करण्यात आला. यात उत्तराखंडमधील कॉर्बेटयइगर रिझर्व, महाराष्ट्रातील ताडोबा-अंधारी टायइगर रिजर्व, मध्य प्रदेशातील कान्हा टायगर रिझर्व्ह आणि बांधवगड टायगर रिझर्व्ह तसेच केरळमधील पेरियार टायगर रिझर्व्ह यांचा समावेश होता. दोन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या या बहु-व्याघ्र प्रकल्प अभ्यासातून वाघिणींसाठी आरोग्यदायी प्रजनन क्षेत्र झपाट्याने कमी होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. शास्त्रज्ञांनी आनुवंशिकदृष्ट्या निश्चित केलेल्या ६१० वाघांच्या विष्ठा नमुन्यांचे विश्लेषण केले. यामध्ये २९१ मादी आणि १८५ नर वाघांचा समावेश होता. पर्यटन मार्ग आणि मानवी हस्तक्षेप असलेल्या भागांजवळ राहणाऱ्या वाघांमध्ये तणाव निर्माण करणाऱ्या हार्मोन्सचे प्रमाण अधिक आढळले.



# मध्य व हार्बर रेल्वेमार्गावर ब्लॉक आज लोकल उशिराने धावणार

■ मुंबई

**मध्य** आणि हार्बर रेल्वे उपनगरीय रेल्वे मार्गांवर उद्या विविध तांत्रिक आणि देखभाल कामांसाठी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या मार्गावरील काही लोकल फेऱ्या रद्द, वळविण्यात येण्याची किंवा उशिराने धावण्याची शक्यता असल्याने प्रवाशांनी नियोजन करून प्रवास करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मध्य रेल्वेकडून उद्या स. ११.०५ ते दु. ३.५५ या वेळेत माटुंगा ते मुलुंड दरम्यान अप आणि डाऊन स्लो मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत देखभाल, सिग्नलिंग व ओव्हरहेड वायर दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. परिणामी अनेक स्लो लोकल फास्ट मार्गावर वळविण्यात येतील. त्यामुळे दादर, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप व ठाणे स्थानकांवर गर्दी होण्याची शक्यता आहे. ठाण्यापलीकडील डाऊन जलद गाड्या मुलुंड स्थानकावरून पुन्हा डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील. ठाणे येथून स. ११.०३ ते दु. ३.३८ दरम्यान सुटणाऱ्या अप जलद लोकलही मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळवून माटुंगापर्यंत सर्व स्थानकांवर थांबवण्यात येणार आहेत.

# शौचालय की भाजपा कार्यालय?
## उबाठाच्या अखिल चित्रेंचा सवाल

■ मुंबई

**सार्वजनिक** शौचालयासाठी राखीव असलेल्या जागेवर भाजपा कार्यालय आणि प्रचार साहित्याचे गोदाम उभारल्याचा आरोप उबाठा नेते अखिल चित्रे यांनी केला. बोरीवलीतील एकसर गाव परिसरात हा प्रकार झाल्याचा दावा करत त्यांनी भाजपा आणि मुंबई महानगरपालिकेवर निशाणा साधला. नागरिकांच्या मूलभूत सुविधांवर राजकीय कब्जा केल्याचा आरोप करत त्यांनी तातडीने चौकशीची मागणी केली. अखिल चित्रे यांनी पोस्टमध्ये लिहिले की, मुंबई महानगरपालिकेने या परिसरात नागरिकांसाठी १८ सार्वजनिक शौचालयांची योजना आखली होती. मात्र त्यापैकी तब्बल १० शौचालये प्रत्यक्षात अस्तित्वातच नाहीत. ज्या जागेवर नागरिकांसाठी शौचालय उभारणे अपेक्षित होते.